श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर) संचलित

नॅक पुर्नमुल्यांकन 'बी' ग्रेड प्राप्त

# दूधसाखर महाविद्यालय, बिद्री



2015-2016

# स्पंदन

# श्री दूधसाखर महाविद्यालय, बिद्री (मौनीनगर) युवा महोत्सव



जिल्हास्तरीय युवा महोत्सव महावीर कॉलेज कोल्हापूर
पथनाट्यातील प्रसंग



जिल्हास्तरीय युवा महोत्सव महावीर कॉलेज कोल्हापूर
पथनाट्यातील देशवंदना



जिल्हास्तरीय युवा महोत्सव महावीर कॉलेज कोल्हापूर
पथनाट्यातील शेतकरी कुटूंबाची व्यथा



मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये प्रश्नमंजुषा द्वितीय क्रमांकाचे मानकरी



मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये द्वितीय क्रमांकाचे वादविवाद
सादर करताना कु. माधुरी अस्वले



मध्यवर्ती युवा महोत्सवामध्ये द्वितीय क्रमांकाचे वादविवाद
सादर करताना कु. प्रियांका मगदूम



जिल्हास्तरीय युवा महोत्सव महावीर कॉलेज कोल्हापूर
मुकनाट्यातील प्रसंग




जिल्हास्तरीय युवा महोत्सव महावीर कॉलेज कोल्हापूर
मुकनाट्यातील प्रसंग

श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री (मौनीनगर)
संचलित

नॅक 'बी' ग्रेड प्राप्त

## दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

वार्षिक अंक २३ वा

# स्पंदन

## सन २०१५-१६

### संपादक मंडळ

प्रमुख संपादक
**प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर**

कार्यकारी व विभागीय संपादक
**प्रा. डॉ. सादिक देसाई**

विभागीय संपादक

**प्रा. डॉ. संजय पाटील** मराठी विभाग
**प्रा. डॉ. श्रीकृष्ण साळोखे** इंग्रजी विभाग
**प्रा. डॉ. शशिकांत सावंत** शास्त्र विभाग

## Vision and Mission of our Institution

- **VISION STATEMENT** - Educating the minds of people to seek the knowledge, truth and good citizenship for the betterment of society.

- **MISSION STATEMENT** - To assure, Quality Higher Education to the stakeholders of the institution through the sustained efforts of self and external evaluation.

## स्थानिक व्यवस्थापन समिती

१९/१२/२०१५ पर्यंत

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | मा. आमदार कृष्णराव परशराम पाटील |
| उपाध्यक्ष | : | मा. प्रविणसिंह विश्वनाथ पाटील |
| सदस्य | : | मा. विजयसिंह कृष्णाजी मोरे |
| सदस्य | : | मा. नामदेवराव शंकरराव भोईटे |
| सदस्य | : | मा. वसंतराव बापूसो (तु.) पाटील |
| मुख्य सचिव | : | मा. एस. एस. चौगले |
| सचिव | : | प्रा. डॉ. आर. एल. राजगोळकर |
| शिक्षक प्रतिनिधी | : | प्रा. डॉ. संजय दशरथ पाटील |
| शिक्षक प्रतिनिधी | : | प्रा. दिनकर केरबा शिंदे |
| शिक्षक प्रतिनिधी | : | प्रा. दिगंबर दत्तोबा कोमेजवार |
| शिक्षकेतर प्रतिनिधी | : | श्री. प्रल्हाद विश्वास पाटील |

# श्री दूधसाखर महाविद्यालय, बिद्री (मौनीनगर)



**श्री. अरूण काकडे,**
प्रशासकीय अध्यक्ष
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री



**श्री. संजय ससाणे,** प्रशासकीय सदस्य
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री



**श्री. प्रदीप मालगावे,** प्रशासकीय सदस्य
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री



**मा. आमदार श्री. के. पी. पाटील,** अध्यक्ष
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री
१९/१२/२०१५ पर्यंत



**मा. श्री. प्रविणसिंह वि. पाटील,** उपाध्यक्ष
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री
१९/१२/२०१५ पर्यंत



**मा. श्री. आर. डी. देसाई,** मानद सचिव
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री



**मा. श्री. एस. एस. चौगले,** सचिव
श्री दूधसाखर शिक्षण प्रसारक मंडळ, बिद्री



**मा. डॉ. आर. एल. राजगोळकर,** प्राचार्य
श्री दूधसाखर महाविद्यालय, बिद्री

# श्री दूधसाखर महाविद्यालय, बिद्री (मौनीनगर)

## मान्यवर संचालक मंडळ

१९/१२/२०१५ पर्यंत



मा. श्री. ए. वाय. पाटील



मा. श्री. विजयसिंह मोरे



मा. श्री. नामदेवराव भोईटे



मा. श्री. दत्तात्रय पाटील



मा. श्री. दत्तात्रय ख



मा. श्री. गणपतराव फराकटे



मा. श्री. वसंतराव पाटील



मा. श्री. पंडीतराव केणे



मा. श्री. केरबा नांदेकर



मा. श्री. धनाजीराव



मा. श्री. श्रीपतराव पाटील



मा. श्री. जीवनराव पाटील



मा. श्री. नेताजीराव पाटील



मा. श्री. सुनिलराव कांबळे



मा. श्री. राजेखान ज



मा. सौ. सविता एकल



मा. सौ. कमल चौगले



मा. श्री. विलासराव झोरे

# संपादकीय



प्रा. डॉ. सादिक देसाई
कार्यकारी संपादक

२३ वा वार्षिक अंक 'स्पंदन' आपल्या हाती देताना मला अतिशय आनंद होत आहे. फक्त एका वर्षाकरिता अंकाची जबाबदारी मा. प्राचार्यांनी माझ्याकडे दिली होती पण पुन्हा या वर्षीही कार्यकारी संपादकाची जबाबदारी देऊन माझ्यावर जो विश्वास दाखविला त्याबद्दल मी धन्य झालो.

या वर्षात मनाला चटका लावून देणाऱ्या घटना घडल्या. रौप्य महोत्सवी वर्षाची सांगता होत असताना माझे सहकारी प्रा. संजय गायकवाड यांचे अकस्मित निधन झाले. १९९० साली आमच्या महाविद्यालयातील ते पहिले पीएच. डी. धारक त्यांना संपूर्ण परिसर डॉक्टर या नावाने ओळखत असे. त्यांची प्रेरणा घेऊन मी कला विभागात पहिला पीएच. डी. झालो व सायन्स विभागात डॉ. कुलकर्णी पहिले पीएच.डी. धारक बनले. आज महाविद्यालयात जवळजवळ २५ प्राध्यापक पीएच.डी. झाले. सर्वांच्या बरोबर हसत मुखाने वावरणारी व्यक्ती आमच्यातून निघून गेल्याचे दुःख झाले. तसेच आमचा चतुर्थ श्रेणी कर्मचारी श्री. आळवेकर आर. पी. यांचेही निधन झाले. त्यांनाही सर्वजन मामा या नावाने ओळखत असत. सुरवातीपासूनच्या या व्यक्ती असल्याने महाविद्यालयाच्या जडण घडणीमध्ये त्यांचा मोलाचा वाटा विसरता येणार नाही.

दूधगंगा- वेदगंगा सहकारी साखर कारखान्याच्या सभासद शेतकरी मुलांना उच्च शिक्षण परिसरातच मिळावे या उदात्त हेतूने महाविद्यालयाची सुरवात १९९० साली झाली. आज असंख्य विद्यार्थी सामाजिक, राजकीय, प्रशासकीय क्षेत्रात दूधसाखरचे नाव उज्वल करीत आहेत. महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थी देशात तसेच विदेशातही मोठ्या पदावर कार्यरत आहेत.

विद्यार्थ्यांच्या साहित्य लेखनाला वाव मिळावा. या हेतून 'स्पंदन' अंकाचे प्रकाशन होते. 'स्पंदन' साठी विद्यार्थ्यांनी विपुल प्रमाणात साहित्य लेखन केले. मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेमधील लेख, कविता त्यांची चित्रकला इत्यादी क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रयत्नाचे कौतुक करावेसे वाटते. सर्वच साहित्य प्रसिद्ध करण्यात मर्यादा आल्या त्या बद्दल मी दिलगीरी व्यक्त करतो.

आमच्या मातृसंस्थेचे प्रशासकीय अध्यक्ष अरूण काकडे, प्रशासकीय सदस्य मा. ससाणे व मालगावे माजी अध्यक्ष मा. के. पी. पाटील साहेब, माजी उपाध्यक्ष मा. प्रविणसिंह पाटीलसाहेब, कार्यकारी संचालक आर. डी. पाटील, सचिव एस्. एस्. चौगले, मा. सेक्रेटरी श्री. किल्लेदार, मा. नामदेवराव भोईटे साहेब, सर्व मान्यवर माजी संचालक यांची प्रेरणा व सहकार्य नेहमी आमच्या सोबत असते.

'स्पंदन' प्रकाशनासाठी संस्थेचे प्रोत्साहन, मा. प्राचार्यांचे मार्गदर्शन, संपादक मंडळ, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सहकारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि श्रीपाद ऑफसेटचे मालक श्री. आर. डी. पाटील व त्यांचे सर्व सहकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यामुळेच मी हा अंक आपल्या हाती देत आहे. या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानतो. हा अंक महाविद्यालयाच्या गुणवत्तेत वाढ करेल अशी मी आशा करतो. या अंकातील त्रुटी फक्त माझ्या व चांगल्या गोष्टी आपल्या सर्वांच्या. धन्यवाद!

**थोडस मुखपृष्ठाविषयी...** यावर्षी महाराष्ट्रात भीषण दुष्काळ पडला आहे त्याची झळ प. महाराष्ट्रालाही जाणवत आहे. पाणी किती महत्वपूर्ण आहे. पाणी म्हणजे जीवन हे माहित असूनसुद्धा आपण सर्रास पाण्याचा गैरवापर करतो. पाण्याचे महत्व लक्षात यावे म्हणून एक तहानलेला मुलगा डबक्यातील पाणी सुद्धा पिताना दाखविलेला आहे. शेतकऱ्यांची दुर्दशा तर सर्वांना माहितच आहे.

# मनोगत



**डॉ. आर. एल. राजगोळकर**
प्राचार्य

दूधसाखर महाविद्यालय ब्रिद्री दूधगंगेच्या काठावर डोंगराच्या पायथ्याशी निसर्गरम्य परिसरात वसलेले महाविद्यालय असून चार तालुक्यातील विद्यार्थ्यांची कला व शास्त्र शाखेकडील शैक्षणिक गरज पुरविणारे शिवाजी विद्यापीठ कक्षेमधील दर्जेदार महाविद्यालय म्हणून ओळखले जाते. आणि हे नुकत्याच झालेलया नॅकमार्फत गुणवत्ता चाचणीमध्ये 'बी' ग्रेड () मिळवून सिद्ध केले आहे. १९९० ला स्थापन झालेल्या महाविद्यालयाने रौप्यमहोत्सवी वर्षात पदार्पण केले आहे. महाविद्यालयाकडे पाहिले जाते आणि हे महाविद्यालयाच्या चालू शैक्षणिक वर्षात झालेल्या विद्यार्थी संख्येच्या वाढीवरून दिसून येते. १०० विद्यार्थी संख्येवरून सुरू झालेले महाविद्यालय आज १५०० विद्यार्थी संख्येवर पोहचलेले आहे. आणि पैकी ६०% पेक्षा जास्त ८०० च्या आसपास विद्यार्थीनींची संख्या असलेली दिसून येते.

महाविद्यालयामार्फत विविध उपक्रम राबविले जातात. यु.जी. सी. व लीड कॉलेज अंतर्गत शैक्षणिक, सामाजिक, बौद्धिक, वैयक्तिक गुणवत्ता विकास यासाठी आवश्यक विविध कार्यशाळा आयोजल्या होत्या. १ स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन, २– लेखन कौशलय व अभिनय कौशल्य विकास, ३– संख्याशास्त्र व गणित विषयावरील कार्यशाळा, ४– लेखन कौशल्य विकास, ५– अंधश्रद्धा निर्मुलन इत्यादी. त्याचबरोबर जवळ जवळ विविध महाविद्यालयामध्ये दर्जा व गुणवत्ता असलेले विद्यार्थी येतात. त्याचप्रमाणे आपली गुणवत्ता विकसित करताना दिसतात. ५ वर्षापुर्वी ६ ते ७ पी.एच.डी. धारक प्राध्यापक होते. ते आज २० ते २२ च्या आसपास पोहोचलेले आहेत. आणि १० जण पी.एच.डी. पूर्ण करण्याच्या मार्गावर आहेत.

महाविद्यालयाकडे जवळ जवळ ८० कॉम्प्युटर्स असून सर्व कॉम्प्युटर्स सर्व्हरमार्फत जोडले गेलेले आहेत. इंटरनेट सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. इनफ्लिबीनेट या युजीसी ने पुरविलेले ई–पुस्तके उपलब्ध असलेली सेवा महाविद्यालयात शिक्षक व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून असलेली सेवा महाविद्यालयात शिक्षक व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून असलेली सेवा महाविद्यालयात शिक्षक व विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिलेली आहे.

गेल्या ५ वर्षामध्ये ग्रंथालयातील पुस्तकांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. आणि ती २२००० ते २३००० च्या आसपास आहे.

क्रीडा विभागाकडील विद्यार्थ्यांचे यश लक्षणिय असून जिम्नॅशिअम मध्ये विद्यापीठाचा संघ सलग १५ वर्षे विजेता ठरलेला आहे व टीममधील ८ विद्यार्थ्यांचे विद्यापीठ टीममध्ये निवड झाली. कबड्डीमध्ये महाविद्यालयाचा संघ विजेता ठरला आहे. विद्यापीठ संघाचा कर्णधार हा महाविद्यालयाचा कर्णधार आहे.

मुलींचा ॲथलेटिक्स चा संघ ४ × ४ रिलेमध्ये विजेता ठरलेला आहे. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कुस्ती स्पर्धेत प्राविण्य मिळविले आहे. वरील सर्व विद्यापीठाच्या संघामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणात दिसून येतो. विद्यार्थ्यांच्या क्रीडा स्पर्धेतील यशाबद्दल नॅक समितीने प्रशंसा केली आहे. तसेच महाविद्यालयाचे विद्यार्थी कबड्डी, हॉलीबॉल संघामध्ये आहेत.

सांस्कृतिक विभागाकडील विद्यार्थ्यांची चालू शैक्षणिक वर्षामध्ये जिल्हास्तरीय युवा महोत्सवामध्ये मूकनाट्य, पथनाट्य, समुहगान, वादविवाद स्पर्धेत भाग घेतला होता. प्रश्नमंजुषा व वादविवाद प्रकारात जिल्हास्तरीय व मध्यवर्ती युवा–महोत्सवामध्ये दुसरा क्रमांक मिळविलेला आहे. शिक्षक दिनामध्ये पूर्ण शैक्षणिक कामकाज विद्यार्थ्यांमार्फत राबविले जाते. सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्रातील थोर व्यक्तिंच्या जयंत्या साजऱ्या केल्या जातात. तसेच तसेच एन. एस. एस. विद्यार्थ्यांचा गट गंगापुर येथे गावी 'विशेष श्रमसंस्कार' शिबीरामार्फत दाखल होवून समाजसेवा, समाजप्रबोधन, याकरिता कार्यतर होता. एन. एस. एस. च्या युनिटचे विशेष असे कौतुक नॅक समितीमार्फत केले गेलेले आहे.

महाविद्यालयातील ३३ शिक्षकापैकी २०–२२ शिक्षकांनी २०१६ अखेर पी. एच. डी. पदव्या प्राप्त केल्या आहेत. उर्वरित शिक्षक पी. एच. डी. पदवी पूर्ण करण्याच्या मार्गावर आहेत. युजीसी मार्फत ९ मायनर रिसर्च प्रोजेक्ट महाविद्यालयाकडे कार्यरत होते. शिक्षकांनी शैक्षणिक वर्षामध्ये १०० च्या आसपास लेख प्रसिद्ध केलेले आहेत. व पुढील १२ व्या योजनेमध्ये रिसर्च प्रोजेक्टसाठी प्रस्ताव सादर केले आहेत. महाविद्यालयाचे प्राध्यापकांचे एम. पी. एस. सी. व विद्यापीठ परीक्षेतील योगदान मोठे आहे.

महाविद्यालयाकडील सर्व लॅबोरेटरीज ICT सुसज्ज झाल्या असून महाविद्यालयाकडे जवळ जवळ ८, एलसीडी प्रोजेक्टर, ८० कॉम्प्युटर्स, ६ लॅपटॉप इत्यादी साहित्य आहे. पूर्ण इमारत CCTV संरक्षणाखाली सुरक्षित करण्यात आलेली आहे. यु. जी. सी. अनुदानतून महिला वसतीगृह उपलब्ध झाले आहे.

स्पर्धा परीक्षा विभागामार्फत राज्य स्पर्धा व केंद्रशासन स्पर्धा परिक्षेसाठी मार्गदर्शन केले जाते. बऱ्याच विद्यार्थ्यांना यश संपादन केलेले आहे.

या महाविद्यायाची यशस्वी वाटचाल चाललेली असून विद्यापीठ अनुदान आयोग केंद्रसरकार, राज्यसरकार यांचे आर्थिक पाठबळ मोलाचे आहे. भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा पूर्ण करण्यास महाविद्यालय सक्षम आहे.

महाविद्यालयाच्या वरील सर्व यशामध्ये संस्थेचे अध्यक्ष मा. आम. के. पी. पाटीलसो, मा. उपाध्यक्ष दत्तात्रय तु. खराडेसो व मा. प्रविण पाटील, सर्व संचालक मंडळ, सचिव, कार्यकारी संचालक, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, भागातील नागरिक, विद्यार्थी यांचा मोठा वाटा आहे.

विद्यार्थी गुणवत्ता यादीत येत आहेत आणि ते आमचे पुढील ध्येय आहे.

।। जय हिंद ।।

## स्पंदन अंक प्रकाशन व मालकीसंबंधी माहिती

- प्रकाशन स्थळ : दूधसाखर महाविद्यालय,
  बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर ४१६ २०८
  फोन : (०२३५) २५४८२२
- प्रकाशन काल : वार्षिक
- प्रकाशक व प्रमुख संपादक मुद्रक :प्राचार्य डॉ. आर. एल. राजगोळकर
- राष्ट्रीयत्व : भारतीय
- पत्ता : दूधसाखर महाविद्यालय,
  बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर ४१६ २०८
- कार्यकारी संपादक : प्रा. डॉ. सादिक देसाई
- पत्ता : दूधसाखर महाविद्यालय,
  बिद्री, ता. कागल, जि. कोल्हापूर ४१६ २०८
- मुखपृष्ठ : वेदांत ग्राफिक्स, कोल्हापूर
- संकल्पना : प्रा. डॉ. सादिक देसाई
- मुद्रक : श्रीपाद ऑफसेट, ४६४ ई, शाहुपूरी, कोल्हापूर
- राष्ट्रीयत्व : भारतीय
- पत्ता : व्हिनस कॉर्नर, शाहुपूरी, कोल्हापूर
  फोन : (०२३१) २६५८४०१

---

मी प्राचार्य, डॉ. आर. एल. राजगोळकर असे जाहीर करतो की, वर दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे खरी आहे.

– प्रकाशक

**टीप** : या अंकात व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# हार्दिक अभिनंदन

**श्री दूधसाखर महाविद्यालय, बिद्री (मौनीनगर)**



**डॉ. पाटील एन. डी.**
शारिरीक शिक्षण विषयात
शिवाजी विद्यापीठाची पी.एचडी.



**डॉ. सणदी ए. आर.**
रसायनशास्त्र विषयात
शिवाजी विद्यापीठाची पी.एचडी.



**डॉ. करपे एल. एस.**
अर्थशास्त्र विषयात
शिवाजी विद्यापीठाची पी.एचडी.



**डॉ. पाटील एन. डी.**
तासिक अध्यापक, भौतिकशास्त्र विषयात
शिवाजी विद्यापीठाची पी.एचडी.



**प्रा. पाटील पी. डी.**
आमचे माजी विद्यार्थी
भौतिकशास्त्र विषयात सेट परीक्षा उत्तीर्ण



**प्रा. वंझारे एस. आर.**
संख्याशास्त्र विषयात
सेट परीक्षा उत्तीर्ण



**प्रा. पाटील एस. डी.**
राधानगरी तालुका
एन.एस.एस. समन्वयक
म्हणून निवड



**डॉ. साळोखे एस. ए.**
सुटा संघटनेमध्ये
निवडणूक अधिकारी
म्हणून निवड



**श्री. डावरे युवराज**
माजी विद्यार्थी
विद्यापीठाचा इंद्रधनुष्य कलाकार
उत्कृष्ट पथनाट्य दिग्दर्शक म्हणून निवड

**डॉ. टाकळे एम. व्ही.**
शिवाजी विद्यापीठात
भौतिकशास्त्र विभागात
अधिव्याख्याता म्हणून निवड





**प्रा. पाटील एन. एम.**
कोल्हापूर जिल्हा
जल आराखडा २०२० समितीवर
जिल्हाधिकारीमार्फत निवड

# आमचे गुणवंत ...




कु. महाडेश्वर सुप्रिया
बी. ए.–३ द्वितीय


कु. कुंभार साऊताई
बी. ए.–३ तृतीय


कु. कुदळे वर्षा
बी.एस्सी.–३ प्रथम


कु. फासके अश्विनी
बी.एस्सी.–३ द्वितीय


गोंड नंदकुमार
बी.एस्सी.–३ तृतीय


कु. सुर्यवंशी अनिता
बी. ए.–२ प्रथम


कु. पाटील चांदणी
बी. ए.–२ द्वितीय


कु. बागवान आफ्रिन
बी. ए.–२ तृतीय


कु. पाटील श्वेता
बी.एस्सी.–२ प्रथम


कु. महाडेश्वर पूजा
बी.एस्सी.–२ द्वितीय


कु. पाटील शितल
बी.एस्सी.–२ तृतीय


कु. वर्णे श्रद्धा
बी. ए.–१ प्रथम


कु. चौगले पूजा
बी. ए.–१ द्वितीय


कु. मोरे सुप्रिया
बी. ए.–१ तृतीय


कु. पाटील पूजा
बी.एस्सी.–१ प्रथम


कु. वारके सरिता
बी.एस्सी.–१ द्वितीय


कु. पाटील तेजा
बी.एस्सी.–१ तृतीय


बी. ए.–३ प्रथम,
४ पारितोषिक प्राप्त,
विद्यापीठ गुणवत्तेत ८ वी

कु. फराकटे प्रियांका

## हिंदी स्कॉलरशिप


कु. फराकटे सीमा
बी.ए.–३


कु. पाटील निशीगंधा
बी.ए.–२

## आमचे गुणवंत खेळाडू


पाटील अभिजित
जिमनॅस्टिक


पाटील अनिकेत
जिमनॅस्टिक


पाटील सुरज
डायव्हिंग


राजिगरे विकास
डायव्हिंग


माळवी धनाजी
कबड्डी


राणे वैभव
अॅथलेटिक्स्

''लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी
जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी
धर्म, पंथ, जात एक जाण तो मराठी
एवढ्या जगात माय मानतो मराठी''

– सुरेश भट

# मराठी विभाग

डॉ. संजय पाटील

# अनुक्रमणिका

## ✻ गद्य विभाग ✻


| | | |
|---|---|---|
| १) बी.ए. एक संधी | कु. अनिता सुर्यवंशी | बी.ए-३ |
| २) स्वच्छ भारत-स्वस्थ भारत | कु. संगिता पांडूरंग पाटील | बी.एस्सी-३ |
| ३) विष | अक्षय अशोक घुंगरे-पाटील | बी.एस्सी -२ |
| ४) राजे मागे फिरा | कु. सुनंदा सर्जेराव लोंढे | बी.ए.- ३ |
| ५) प्रत्येकाला शिवाजी व्हाव लागेल | नेताजी साताप्पा ढेरे | बी.ए-३ |
| ६) सांग ना गं आई, काय असतो हा बलात्कार | कु. तेजस्विनी घोरपडे | बी.एस्सी-३ |
| ७) भूक ( कथा) | कु.पूजा विजय पालकर | बी.एस्सी-१ |


## ✻ पद्य विभाग ✻


| | | |
|---|---|---|
| १) आयुष्य म्हणजे काय ? | कु. अमृता उत्तम कांबळे | बी.ए-३ |
| २) बाप | कु.स्नेहल बा. देसाई | बी.ए. -३ |
| ३) आई-वडिल | कु. तेजश्री पाटील | बी.ए -१ |
| ४) शेवटी मी एकटाच | अजय तुकाराम खोराटे | बी.ए -१ |
| ५) वडिलांस पत्र | कुणाल वसंत फाळके | बी.एस्सी -२ |
| ६) आपल माणूस कायमचं जाण्यापूर्वी | कु. दिपाली फराकटे | बी.एस्सी -३ |
| ७) तीन गोष्टी | कु.कोमल शिवाजी पाटील | बी.एस्सी -२ |
| ८) नशीब | कु.सायली रविंद्र सामंत | बी.एस्सी -२ |
| ९) गणित | कु.सुवर्णा साताप्पा फराकटे | बी.एस्सी -२ |
| १०) आयुष्य | कु.प्राजक्ता प्रकाश पाटील | बी.एस्सी-२ |
| ११) मी मराठी.......! | कु.रोहिणी मारूती ताशिलदार | बी.एस्सी -३ |
| १२) दंगा | कु. पोर्णिमा हिंदूराव गौड | बी.ए. -३ |
| १३) आणखी काय हव सांगा | कु. नम्रता मारूती पाटील | बी.ए.-३ |
| १४) आयुष्य | कु.पुजा यशवंत पाटील | बी.ए- ३ |
| १५) बाप | कु.सुप्रिया शहाजी संकपाळ | बी.ए. -३ |
| १६) मैत्री | कु.पुनम बबन पाटील | बी.ए -३ |
| १७) शिरं टांगलेली झाडं | स्वप्निल आनंदा कांबळे | बी.एस्सी -३ |
| १८) प्रेम म्हणजे | रामचंद्र कृष्णात कांबळे | बी.ए .-२ |

| | | |
|---|---|---|
| १९) शब्दशिल्प | कु. तेजश्री सुनिल चौगले. | बी.ए -१ |
| २०) काय विसरलो ? | प्रफुल्ल तानाजी पाटील | बी.एस्सी-२ |
| २१) अस एक प्रेम | अनिकेत जितकर | बी.एस्सी -१ |
| २२) मोबाईल | कु.स्वप्नाली दत्तात्रय जाधव | बी.एस्सी -२ |
| २३) बाप कुणा कळत नाही | कु.निलम शिवाजी पाटील | बी.एस्सी -३ |
| २४) घराबाहेर | कु.कविता आनंदा कोंडेकर | बी.एस्सी-३ |
| २५) होस्टेल जीवन | कु.स्नेहा आप्पासो पाटील | बी.एस्सी -३ |
| २६) अवघड म्हणजे अशक्य नव्हे | कु. आसावरी उदय पाटील | बी.एस्सी -३ |
| २७) इंटरनेटवरील आयुष्य | अरूण एकनाथ पाटिल | बी.एस्सी -३ |
| २८) बालिका वधू | कु.दमयंती दयानंद घारे | बी.ए. -३ |
| २९) प्रयत्न | कु. आश्विनी तुकाराम कांबळे | बी.ए. -३ |
| ३०) कन्यादान | कु. रूपाली मोहन पाटील | बी.ए. -३ |
| ३१) आयुष्य खूप सुंदर आहे | कु. प्राजक्ता रामचंद्र शिंदे | बी.ए. -३ |
| ३२) युवापिढीची व्यसनाधीनता | कु.मयुरी मधुकर पाटील | बी.ए. -३ |
| ३३) जीवन हे असेच असते | आनंदा भगवान कुंभार | बी.ए. -१ |
| ३४) बाबा काठी टाकून द्या | सौरभ ज्ञानदेव एरूडकर | बी.एस्सी. -१ |
| ३५) लोक काय म्हणतील ? | विनायक मच्छिंद्र साबळे | बी.ए. -२ |
| ३६) मैत्री म्हणजे काय ? | कु.सुरेखा मधुकर पाटील | बी.ए. -२ |
| ३७) साद देते मैत्रीला | कु. अंकिता अनिल देवर्डेकर | बी.ए.-२ |
| ३८) खरं प्रेम | विकास तुकाराम कांबळे | बी.ए. -२ |
| ३९) माझी मायबोली | सचिन तानाजी सुतार | बी.ए.-३ |
| ४०) क्या बात है | कु. पुजा महिपती भिऊंगडे | बी. एस्सी.३ |

## * इतर *

| | | |
|---|---|---|
| १) गमतीदार लग्नपत्रिका | कु. विद्या महादेव गोधडे | बी.एस्सी.-३ |
| २) अशीही वटपोर्णिमा | कु.स्नेहल मुळीक | बी. एस्सी-३ |

# बी. ए.
# एक चांगली संधी

– अनिता सुर्यवंशी

मी १२ वी विज्ञान शाखेतून केलं यात मोठे असे काहीच नाही. विज्ञान सर्वांना खूप मोठं वाटतं. तसेच आता बी.एस्सी. करतेस का? असं विचारतात पण मी बी.ए. करते यावर स्मित हास्य करतात. बी.एस्सी. म्हणजे अगदी उच्च शिक्षण घेणे असा समज असावा लोकांचा. पण, जर मी बी.एस्सी.करत असते तर आपल्या देशाचा राज्यकारभर कसा चालतो? आपला इतिहास काय आहे? याची माहिती मिळाली नसती. बी.ए. करत असताना आपल्याला भरपूर वेळ मिळतो. कारण कॉलेज सकाळी ८ ते ११.१५ पर्यंत असते. माझं कॉलेज म्हणजेच दूधसाखर महाविद्यालय, बिद्री. महाविद्यालयातील सर्व तासिका होतात. त्यामुळे सर्व विषयांची भरपूर माहिती सरांकडून मिळते. लवकर कॉलेज असल्याने लवकर उठण्याची सवय लागते. तसेच वाचनाची सवय लागते. घरी पोहचल्यानंतर घरातील कामे करून देखील भरपूर वेळ मिळतो. त्या वेळेचा सदुपयोग करून घ्यावा. बी.ए.च्या विद्यार्थ्यांना घरचा अभ्यास काहीच नसतो. पण वाचन करत रहाणे हे आपले एक कामच समजंल पाहिजे.

विदयार्थ्यांनी नेहमी वर्तमानपत्राचे वाचन करावे. ज्यांना पेपर घरी मिळत नसेल तर मालिका व पिक्चर यांचे टि.व्ही वरचे स्थान कमी करून आपण दररोज बातम्या ऐकल्या पाहिजेत. बी.एस्सी. करणारे विद्यार्थी खूप हुशार असतात मी मान्य करते पण त्यांच्यापेक्षा आपण कसे स्मार्ट व्हायचे याचे की मार्ग आहेत ते पुढीलप्रमाणे.

१) आपल्याजवळील आत्मविश्वास जागृत ठेवा.

२) वाचनाची आवड जोपासा.

३) दूरदर्शनवर ३ तास म्हणजे ३×६० =१८० मिनीटे व ३×३६०० =१०८०० सेकंद वाया घालवण्यापेक्षा एक तास बातम्या पाहिल्या तरी हरकत नाही. बी.ए. च्या मुलींना मालिकांमध्ये खुप आवड असते. मला पण खूप मालिका आवडायच्या पण नंतर समजले की, दूरदर्शन पाहणे ही एक सवयच झाली. आपण दुरदर्शन एक विरंगुळा म्हणून थोडयाच प्रमाणात पाहिले पाहिजे.आपल्याला कित्येक प्रश्नांची उत्तरे वाचनातुन मिळतात पण लक्षात ठेवा प्रश्न पडण्यासाठी देखील वाचन करावे लागते. असेच मला काही प्रश्न पडले होते. त्याची उत्तरे देखील मला वाचनातून मिळाली.

प्रश्न १) तांदळात आळया कशा होतात?

तांदळात एक किटक अंडी घालतो त्यातुन त्यांना योग्य हवा मिळते व अळी तयार होते.

२) रूग्णवाहिकेवर ॲम्ब्यूलन्स उलटे का लिहीलेले असते?

याचे उत्तर ८ वीच्या विज्ञानाच्या

पुस्तकामधून मिळाले पुढील वाहनाच्या आरशातुन ते सरळ Ambulance दिसावे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर हे वाचनातुन मिळते.

कॉलेजच्या प्रत्येक कार्यक्रमात सहभागी व्हावे. प्रत्येकाच्या कला-गुणांना वाव देण्यासाठी ही एक चांगली संधी आहे. प्राथमिक शिक्षण हा बेस मानला जातो.पण बी.ए. ही एक इमारत बांधण्यासाठी संधी ठरवा व मनापासुन प्रयत्न करत रहा.

बी.ए.च्या मुलांसाठी/ विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा महत्त्वपूर्ण आहेत. कारण फक्त बी.ए. पदवी मिळाली म्हणजे आपल्याला नोकरी मिळणेबाबत संदेह आहे. त्यामुळे मिळालेल्या वेळेचा वापर करून स्पर्धा परीक्षेची तयारी करावी ४ थी ते १२ वी पर्यंतची सर्व विषयांची पुस्तके वाचुन काढावीत याचा उपयोग आपला बेस तयार होतो. तसेच बी.ए. अभ्यासक्रम खूप महत्त्वपूर्ण आहे. विषयाबरोबर इतर विषयांची पुस्तके वाचन करावी बी.ए. एक संधी म्हणून शिकले पाहीजे. आपलं यश आपल्याच हातात असते. प्रभावी व्यक्तीमत्व बनवायचे झाल्यस वाचन करावे लागते. प्रभावीपणे बोलणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे वाचन असते त्यामुळे त्या व्यक्ती प्रभावीपणे आपले मत व्यक्त करत असतात. म्हणजेच 'वाचाल तर वाचाल' यासाठी बी.ए. ही एक दीर्घ काळाची संधीच चालून आलेली आहे.

****

## आयुष्य म्हणजे काय.....?

आयुष्य म्हणजे काय आहे....?
एक धूंद संध्याकाळ, ४ मित्र, ४ कप चहा, १ टेबल आयुष्य म्हणजे काय....
१ इनोव्हा कार, ७ मित्र आणि एक मोकळा पहाडी रस्ता आयुष्य म्हणजे काय....
१ मित्राचं घर, हलकासा पाऊस, आणि खुप खूप गप्पा आयुष्य म्हणजे काय ....
शाळेचे मित्र, बुडवलेला तास, १ कचोरी, २ समोसे आणि बिलावरून झालेला वाद
आयुष्य म्हणजे काय.....
फोन उचलताच पडणारी मित्रांची गोड शिवी आणि सॉरी म्हटल्यावर अजून एक शिवी आयुष्य म्हणजे काय...
काही वर्षानंतर, अचानक जून्या मैत्रिणींचा एक मेसेज अंधुक झालेल्या काही ओल्या आठवणी आणि डोळयातले पाणी
आपण खूप मैत्रिणी-मित्र जमवतो, काही खूप जवळचे मित्र बनतात, काही खास बनतात, काहींच्या आपण प्रेमात पडतो, काही परदेशात जातात, आपण काहींना सोडतो, काही संपर्कात राहतात, काही संपर्क करत नाहीत, त्यांच्या अहंकारामुळे , कधी आपण संपर्क करत नाही, आपल्या अहंकारामुळे , ते कुठेही असतो कसेही असोत, आपल्याला त्यांची आठवण असतेच कारण आपल्या आयुष्यात त्यांचे एक स्थान असतंच तुम्ही किती वेळा भेटता, बोलता, किंवा किती जवळचे आहात ते महत्त्वाचे नाही. जुन्या मित्रांना कळुदे की तुम्ही त्यांना विसरला नाहीत. आणि नवीन मित्रांना सांगा की तुम्ही त्यांना विसरणार नाही.

**- कांबळे अमृता उत्तम**
बी. ए. - ३

# स्वच्छ भारत
# स्वस्थ भारत

कु. संगिता पांडुरंग पाटील
बी. एस्सी. भाग-३

"स्वच्छ सुंदर परिसर, जीवन निरोगी निरंतर" स्वस्थ जीवनाचा कानमंत्र स्वच्छताच आहे. सध्याच्या युगात स्वच्छता ही काळाची गरज बनलेली. आहे. आपला भारत देश सर्व बाबतीत सर्वगुण संपन्न आहे मग स्वच्छतेच्याबाबतीच मागे का? हा प्रश्न माझ्यासारख्या सर्वांना पडला पाहिजे. तरचं स्वच्छतेच्या दृष्टीने यशस्वी वाटचाल होवू शकेल. आपल्याला जर आपला भारत देश स्वच्छ व समृध्द बनवायचा असेल तर आपणच एक पाऊल स्वच्छतेच्या दिशेने उचलले पाहिजे. सर्वांनी स्वच्छतेच्या दिशेने वाटचाल केली पाहिजे.

आपल्या सर्वांचा एक उद्देश
'स्वच्छ सुंदर भारत देश'

आपण आपली घरे दारे, परसबाग, गल्ल्या रस्ते स्वच्छ केली पाहिजेत. तर मग गाव, तालुका, जिल्हा, राज्य स्वच्छ होत होतं आपला देश कधी स्वच्छ होईल हे समजणार पण नाही. रोगराईच प्रमाण वाढंतच चाललं आहे. याचं कारण आहे अस्वच्छता. ग्रामीण तसेच शहरी भागात ताप मलेरिया, डेंग्यू, स्वाईन फ्लू,टॉयफॉईड, कॉलरा यासारखे आजार झपाट्याने लागू होवून किती जण या रोगांना बळी पडतात. त्यापेक्षा आपण जर स्वच्छता राखली तर रोगराई पसरणार नाही व आपले आरोग्य चांगले राहील. भारत स्वच्छ करण्यासाठी कित्येक योजना राबवल्या जात आहेत पण त्या संधीचं सोनं आपण सर्वांनी केलं पाहिजे.

स्वच्छ भारत हे नवीन अभियान सुरू झालं आहे. त्यांचा उद्देश असा आहे की गावेच्या गावे स्वच्छ करून माणसांच्या मनांत जनजागृती निर्माण करायची.

'केल्याने होतं आहे रे आधी केलेची पाहिजे.'- हे संत रामदासांचे वचन संत गाडगे बाबांना लागू पडते. गाडगे बाबांनी स्वच्छतेसाठी भरपूर प्रयत्न केले. त्यांनी स्वच्छतेसाठी स्वतःच पहिले पाऊल उचलले. त्यांनी स्वतःच्या हातात झाडू व मडक्याचा फुटका तुकडा घेऊन गावोगावी फिरले, गावं स्वच्छ केली व लोकांच्या मनात स्वच्छतेविषयी आवड निर्माण केली. तशीच आवड २१ व्या शतकातील लोकांच्या मनात झाली पाहिजे व आपला स्वच्छ भारत समृध्द भारत करण्याचा विडा उचलला पाहिजे. गाडगे बाबा संत झाले ते त्यांच्या कतृत्वाने.

२ ऑक्टोंबर हा गांधीजीचा जन्म दिवस. २ ऑक्टोबर या दिवशी स्वच्छ भारत या अभियानास सुरूवात केली. गांधीजीनी देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. पण त्यांचं भारत स्वच्छ करण्याचे स्वप्न अपूर्ण राहिलं आहे ते आपल्याला पूर्ण करायच आहे. भारततात लोक स्वच्छ, सुंदर, समृध्द जीवन जगत यशाच्या पाय-या पार पडू दे. त्यासाठी त्यांची इच्छा पूर्ण व्हावी म्हणून हे अभियान सुरू केलं. या

अभियानात १.०४ करोड परिवाराचा विचार करून त्यांत २.५ लाख सामुदायिक शौचालय आणि २.६ लाख सार्वजनिक शौचालय चालू करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये जिथं जिथं वैयक्तिक शौचालय चालू करणं कठिण आहे तिथं सार्वजनिक शौचालय चालू करणार आहेत. पर्यटन क्षेत्र, बाजार, रेल्वेस्थानक, बसस्थानक याठिकाणी शौचालयाची व्यवस्था करणार आहेत. शौचालया-साठी पाच वर्षात ४४०१ शहरात ६२.००९ करोड केंद्र सरकार तर्फे मिळालेल्या रक्कमेतून १४६२३ शौचालये उपलब्ध केले जाणार आहेत.

ग्रामीण भाग हा मागासलेला असतो. त्यांना कोणत्या योजना, उपक्रम राबवले जातात हे माहितं नसतं. त्यांच्यासाठी निर्मल भारत योजना सुरू केली आहे. स्वच्छ भारत अभियानं हा उपक्रम पाच वर्षात पूर्ण करण्यात येणार आहे. त्यासाठी निर्मल भारत हे लोक केंद्रित क्रेंद चालू केले गेले आहे. खेडयापाडयातील लोकांना ११ करोड ११ लाख शौचालय बांधण्यासाठी १ लाख ३४ करोड रूपये खर्च करण्यात येणार आहेत. त्यासाठी पुरेपुरं प्रयत्न केले जाणार आहेत. इंग्लिशमध्ये एक सुविचार आहे Try Try but don't Cry प्रयत्न करा, पण प्रयत्न करताना मागे पाहू नका. यश नक्की मिळेल. निर्मल भारत या योजनेव्दारे शाळा, शिकावू विदयार्थी, शिक्षक यांना कॉलेज, विदयालय सोडून ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हापरिषद यांना जोडले जाणार आहेत. या अभियाना अंतर्गत शौचालयासाठी १०,००० हजार ऐवजी १२,००० अनुदान चालू केले आहे. त्याचबरोबर हात धुण्यासाठी बेसिन जोडण्याची अट आतली आहे.

''स्वच्छता हवी दारोदारी
तर शौचालय बांधा घरोघरी''

छोटया छोटया गोष्टीवरून परिसर अस्वच्छ बनतो. प्लॅस्टीक वापरू नये आणि वापरल्यास ते बाहेर न फेकता जाळून टाकावे. संडास करून आल्यावर हात साबणाने किंवा राखेने धुणे गरजेचे आहे. जनावरांचे मलमुत्रासाठी शोषखड्डा खणला पाहिजे. जनावरे नदीत न धुता योग्य त्या जागेवर ती धुवावीत. जेवणापूर्वी हात स्वच्छ धुणे व जेवल्यानंतर दात घासणे.

'' जेवणापूर्वी धुवा हात आणि जेवणानंतर धुवा दात'' शाळाशाळांमधून हे अभियान २५ सप्टेंबर २०१४ ते ३१ऑक्टोंबर २०१४ मध्ये सुरू झाले आहे. त्यामध्ये आपल्या सर्वांचा भाग मोलाचा ठरणार आहे. आपल्या शाळेतील ग्रंथालय, प्रयोगशाळा स्वच्छ व निटनेटक्या ठेवल्या पाहिजेत. बाग बगीच्यातील कच-याची विल्हेवाट लावली पाहिजे, शाळेचे क्रीडांगण स्वच्छ केले पाहिजे. शाळेतील पिण्याची पाण्याची टाकी रोज स्वच्छ केली पाहिजे. शाळेच्या पटांगणातील कचरा कचरापेटीत टाकला पाहिजे. आपल्या शाळेतून, कॉलेजमध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबीर केले जाते. त्यामध्ये आपण भाग घेऊन स्वच्छतेसाठी सतर्क, तत्पर राहिले पाहिजे व लोकांच्या मनात स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण केली पाहिजे.

आपल्या घरामध्ये पिण्याची पाणी उंचावर ठेवले पाहिजेत. आपल्या दारासमोरील परिसर निटनेटका पाहिजे. भांडी नदी, तलावात न धुता

घरांमध्ये धुवायची. जनावरांचा गोठा स्वच्छ ठेवायचा. कपडे नदीमध्ये न धुता घरामध्ये धुवून त्या सांडपाण्यावर प्रक्रिया करून पाणी वापरायला घ्यावे तर आपले जीवन आनंदी राहील व मन स्वच्छ होईल. स्वयंपाकघर, गोडाऊन, स्टोअररूम वेळच्या वेळी साफ केल्या पाहिजेत. घरांची रंगरंगोटी वेळेवर केली पाहिजे. तरच आपला देश स्वच्छ होईल.

१५ ऑगस्ट २०१५ रोजी राजर्षी शाहू ग्राम स्वच्छता अभियान सुरू करण्यात आले आहे. स्वच्छ भारत मिशनला गती मिळावी तसेच स्वच्छतेची चळवळ ग्राम पातळीवर निरंतर सुरू रहावी व स्वच्छतेबाबत लोकांमध्ये जागृती व लोक सहभाग वाढविण्याच्या या उद्देशाने हे अभियान सुरू करण्यात आले त्यामध्ये श्रमदानातून गाव स्वच्छ करणे. श्रम करून स्वच्छतेची आवड जोपासणे.

विहीर, पाण्याची टाकी, तलाव यामध्ये गप्पी मासे सोडणे म्हणजे पाणी स्वच्छ करण्याचे काम करतात. 'गप्पी मासे पाळा रोगराई टाळा', विद्युत पंप, पाण्याची टाकी या ठिकाणी प्रदूषण होवू नये म्हणून त्यासाठी त्या ठिकाणी धोबी कट्टे व सांडपाण्यासाठी शोषखड्डे आणि व्यवस्था करणे. सार्वजनिक स्तरावर सांडपाण्याच्या व्यवस्थापनेसाठी समतल प्रतीची समतल पातळीप्रमाणे गटारे आखणे यामुळे होणारी अस्वच्छता टाळली तर आपल्याला रोगराई होणार नाही, थोडयाच दिवसापूर्वी गणेशोत्सव संपन्न झाला. त्यात पाण्यात मुर्ती न सोडता मुर्तिदान केल्यानं पाणी प्रदुषण होणार नाही. तसेच एक गाव एक गणपती करण्याचा प्रयत्न करून भारत देश बलशाली बनवा. स्वच्छतेमुळे आपल्या देशात सुख व शांती लाभेल.

''माझा भारत, माझा भारत,
बलशाली हा माझा भारत.
अंधारातील दिपक होईल,
सुख–शांतीची वाट दाखवील.''

सगळीकडे स्वच्छतेचे दिवे लावून. सगळा देश प्रकाशमान होवून जाईल. स्वच्छता करणे हे नुसतं सरकारचं काम नाही त्यात आपण सुद्धा सहभागी झालं पाहिजे. महात्मा गांधी गावोगावी स्वच्छता करण्यासाठी गेले नव्हते तर त्यांच्या विचारांचा प्रभाव लोकांवर पडला.

महात्मा गांधीनी जे भारतासाठी स्वप्न पाहिलं होतं ते केवळ राजनैतिक स्वातंत्र्य नसून एका स्वच्छ देशाची कल्पना होती. गांधीजीनी भारताला गुलामीतून सोडवून स्वातंत्र्य प्राप्त करून दिले. आता आपलं कर्तव्य आपल्याला पूर्ण केलं पाहिजे. भारताला अस्वच्छतेतून दूर करून भारत मातेची सेवा केली पाहिजे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांना २०१६ सालीच्या १५० व्या जयंतीनिमित्त अनोख्या पद्ध्दतीनं आदरांजली अर्पण करण्यासाठी स्वच्छ भारत या अभियानांची संकल्पना मांडली होती. नरेंद्र मोदी यांनी एक कदम, स्वच्छता की ओर, या घोषणावाक्यात प्रत्येक भारतीय या अभियानाच्या दिशेनं वळतील १००% भारत स्वच्छ करण्याचा प्रयत्न करतील अशी आशा व्यक्त केली.

आपण आपल्या आजूबाजूचा परीसर, गावे,घरे,स्वच्छ करून भारतात आरोग्य संपदा नांदेल यासाठी नक्कीच प्रयत्न करून 'स्वच्छ भारत, स्वस्थ भारत भारत' हे मिशन पूर्ण करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच पंकजाताई मुंडे यांना मदत करून येत्या पाच वर्षात आपला भारत देश सुखी, समृध्दी व निरोगी बनवूया. तसेच गांधीजींच्या १५० व्या जयंतीनिमित्त 'स्वच्छ भारत–स्वस्थ भारत' हे त्यांच अपूर्ण स्वप्न पूर्ण करून त्यांना आदरांजली वाहू व आपला देश भारत देश स्वच्छ, सुंदर फुलांनी नटलेला, फळांनी बहरलेला करूया व गांधीजींचं आणि संत गाडगेबाबाचे स्वच्छं, सुंदर भारत, स्वस्थ भारत, हे स्वप्न आपल्या हातात स्वच्छतेची सुत्रे घेऊन यशाची शिखरे पार पाडूया.

****



– माने पंकज
बी.एस्सी. २

# बाप

आईचं गुणगान खूप झाले,
पण बिचाऱ्या बापाने काय केले ?
बिकट प्रसंगी बापच सदा सोडवी,
आपण फक्त गातो आईचीच गोडवी.
आईकडे असतील अश्रुंचे पाट,
तर बाप म्हणजे संयमाचा घाट.
आठवते जेवण करणारी प्रेमळ आई,
त्या शिदोरीची सोय ही बापच पाही.
देवकी–यशोदंचं प्रेम मनात साठवा,
टोपलीतून बाळास नेणारा वासुदेव ही आठवा.
रामासाठी कौशल्याची झाली असेल कसरत,
पुत्र वियोगाने मरण पावला बाप दशरथ.
काटकसर करून मुलास देतो पॉकेटमनी,
आपण मात्र वापरतो शर्ट–पँट जुनी.
मुलीला हवे ब्युटीपार्लर, नवी साडी,
घरी बाप आटपतो बिनसाबणाची दाढी.
वयात आल्यावर मुले आपल्याच विश्वात मग्न,
बापाला दिसे मुलांचे शिक्षण, पोरीचे लग्न.
मुलांच्या नोकरीसाठी जिना चढून लागते धाप,
आठवा मुलीच्या स्थळासाठी उंबरठे झिजवणारा बाप.
जीवनभर मुलांच्या पाठी बापाच्या सदिच्छा,
त्यांना समजून घ्यावं हीच माफक इच्छा.

– स्नेहल बा.देसाई
बी. ए.– ३

# विष.........

- अक्षय अशोक घुंगरे पाटी
बी. एस्सी. भाग

या धरतीवर राहणा-या प्रत्येक सजीवात विषाचा वास आहे, हे सत्य आहे. मनुष्य जीवनात होणा-याअतिरेकाचा श्वास म्हणजे 'विष'. हो आपल्या आयुष्यात आपण कोणतीही गोष्ट अतिप्रमाणात करतो किंवा त्या गोष्टीचे आपल्या आयुष्यातील स्थान गरजेपेक्षा अधिक असेल तर त्यावेळी ते'विष' होते. मानवाच्या जीवनात अनेक स्वर, राग, रंग आहेत, पण याचे होणारे अतिप्रमाण आपल्या आयुष्यात विषाचे काम करते, ते आपल्यासाठी 'विष' ठरते.

मानसातील भावना, सवयी, संगती ज्यावेळी प्रमाणाबाहेर वाढतात, त्यावेळी आपल्याला या विषाची चाहूल जाणवते. जे सुज्ञ या विषयाला ओळखून सावरण्याचा प्रयत्न करतात, त्यांचे भावी आयुष्य सुखद असते. याविरूध्द जे लोक या विषाचे अगणित पेले प्राशन करत रहातात, त्यांची अवस्था एखादया अथांग महासागरात हरवलेल्या बोटीसारखी होते, जिला किना-यावर तर यायचे आहे ती किनारा शोधत असते पण किनाराच सापडत नसतो; हे यातले एक कटु सत्य.

एखादया माणसात भावना नसतील किंवा त्यात भावनांचा अंशच नसेल तो भावनाहीन असेल. तर तो मनुष्य कसा? हा प्रश्न आपल्याला पडेल, माझं आयुष्य, हे माझं, ते माझं, मी, मीऽऽ आणि मी करणारा, आणि देहाच्या आत मनाच्या खोलवर दाबुन ठेवलेल्या भावना वेळकाळ पाहून प्रकट करणारा प्रेमळ, रागीट, संवेदशील, मत्सरी, गर्वि त्यागी, भोगी आणि स्वार्थी असा मनुष्य नावाच प्राणी या पृथ्वीतलावर यात तिळमात्र शंका नाही कारण हे लिहणारा मी ही आपणासर्वांप्रमाणेच प्रचं मोठया प्रमाणात साठवून ठेवलेल्या भावनांनसोब या पृथ्वीवरच आहे, यात संदेह नाही. माणसा असणारे एखादया दुस-या व्यक्तिविषयीचे प्रेम राग, तिरस्कार, आदर,श्रध्दा, विश्वास आणि स्वतःमधील मी पणा, गर्विष्ठवृत्ती,स्वार्थीस्वभाव निष्काळजीपणा या गोष्टीचे आपल्या आयुष्याती अतिप्रमाणत आपल्यासाठी विषाचे काम करते आपण नेहमी आनंदात राहतो आपल्यासाठी उत्तम आहे, पण आपल्यासाठी अतिआनंद धोक्याच किंवा बेफिकिरीचा मोह न टाळता येण्यासारख असेल. माणसाने कमीत-कमी दुःखी व नेहमी हास्यउल्हासित राहण्याचा प्रयत्न करावा, आपल हा प्रयत्न दुःखावर मात करण्यास आपल्याला मदत करेल. आयुष्यात येणा-या आंबटगोड क्षणांव आपले आयुष्य ठरते. जो मनुष्य आपल्या एखादय दुखण्याला घेवून नेहमीच दुःखी असतो, दुःखी राहतो त्यावेळी तो सतत आपल्या आयुष्या विषाची अनुभूती करवुन घेत असतो. नेहमी रड किंवा हसत बसण्यापेक्षा वेळेची गरज ओळखू वागणे कधीही योग्य, त्यावेळी तेच बरोबर असेल.

कोणत्या एका व्यक्तीबद्दल आपल्या मना प्रेमभावना असणे यात गैर काय? पण प्रेमाची रि

चुकत असेल, असणारे प्रेम एकतर्फी किंवा बिनभरवश्याचे असेल तर कालांतराने हव्या हव्या वाटणा-या त्या अविस्मरणीय क्षणांचा त्रास सहनशक्तीचा अंत पाहतो आणि ते आपल्या आयुष्यात विषाचे काम करते. त्याचप्रमाणे आईवडिलांचे असणारे आपल्या मुलांवरील प्रेम. कदाचित कोणत्याही अपेक्षेशिवाय आपला विचार न करता मुलांना सर्वस्व देणाऱ्या एका नटसम्राटाच्या आयुष्याच्या उतार वयात त्यांना या विषाचा अनुभव येतो, आणि या अनुभवात त्यांचा अंत होतो. या गोष्टीवरून या विषाचे, विषारीपणाचे गांभीर्य आपल्या लक्षात येते. पण हे फक्त प्रेमाबद्दल नाही, तर आपल्यात असणारा राग, गर्व, निष्काळजीपणा, आळस, श्रध्दा, विश्वास, त्याग आणि स्वार्थ यावरही ही बाब तशीच्या तशी लागू पडते. या गोष्टींचे अतिप्रमाण आपल्यासाठी विष ठरते.

मानसाच्या मनात प्रेमाइतकीच प्रबळ भावना म्हणजे एखादयाचा तिरस्कार किंवा त्याच्या विषयीचा राग. कोणामुळे आपल्याला दुःख झाले असेल तर त्याच्या माफीच्या अपेक्षेविना त्याला माफ करने हा रागावर संयम ठेवण्याचा उत्तम मार्ग आहे, नाहीतर वाढत जाणारा राग आपल्यासाठी विष असेल. त्याचप्रमाणे गर्व, निष्काळजीपणा आपल्या स्वभावात, आपल्या वागण्यात अतिप्रमाणात असल्यास ते आपल्यासाठी विषाचे काम करते. या विश्वामध्ये सर्वात श्रेष्ठ असा कोण? विचारल्यास आपल्यातोंडी देवाखेरीज दुसरे कोणते नाव येणे अशक्य. कदाचित देवापेक्षा श्रेष्ठ कोणीच नाही, देवच सर्वस्व आहे' हे वाक्य मी श्रध्देपोटी लिहंल. पण देवावरील फक्त श्रध्दा, कारण मी कदाचित म्हणतोय ज्यावेळी मी फक्त आणि फक्त देवच म्हणेन त्यावेळी माझी श्रध्दा अंधश्रध्देच्या विळख्यात असेल आणि ही अंधश्रध्दा रुपी रोपटयाचे वृक्ष होईल व त्या वृक्ष्याच्या सावलीत आपण या विषाचा अनुभव घेऊ, हे आपल्या आयुष्यासाठी विषाचे काम करते. माणसाच्या अगी बिलकुल परस्पर गोष्टी म्हणजे दुस-याचा विचार किंवा स्वतःचा विचार, या दोन गोष्टींवर आपले व्यक्तीमत्व समाजात आखले जाते. आपल्या अंगी असणारा त्याग किंवा आपला स्वार्थ, आपल्या स्वभावात दोन्हींचा समावेश अनिवार्य आणि योग्य आहे. पण ज्या एका ठिकाणी त्यागाचे अतिप्रमाण किंवा स्वार्थाचे अतिप्रमाण होईल तेथे आपल्याला काहीतरी हरवल्याची व एकटेपणाची दरी निर्माण झालेली दिसेल. पर्यायाने या गोष्टींचे अतिप्रमाण आपल्या आयुष्यात विष म्हणून काम करेल.

माणसासाठी गरजेच्या काही गोष्टी वा आपल्या भावना जोपासणे योग्य पण त्यांचे होणारे अतिप्रमाण माणसांसाठी घातक ठरेल. हे अतिप्रमाण म्हणजे आपल्या आयुष्यात विषाचे कारण निर्माण होणा-या गोष्टीं ओळखून त्यांचे आपल्या आयुष्यातील प्रमाण आपण ठरवणे कधीही शहाणपणाचे ठरेल, आपण हे ठरवलेले प्रमाण आपल्या भावी आयुष्याची गुंतवणूक असेल किंवा भावी सुखद आयुष्याचे कारण असेल

****.

# राजे मागे फिरा........!!!!

- कु. सुनंदा सर्जेराव लों
बी. ए.

खरंच सांगते गुस्ताखी माफ,पण दुर्देवी आहात तुम्ही आज तुमच्याच स्वराज्यात तुमचीच कुचंबना करतोय आम्ही, राजे नका येवू पुन्हा इथे, मावळा आहे आज लाचार,सरदार विकले मोंगलाईला, सगळीकडे माजलाय अनाचार, आज रायरेश्वरला गेल्यावर एकटेच शपथ घ्यावी लागेल. कोंढाणा जिंकायला तुम्हालाच घौडदौड करावी लागेल, आज नाही तानाजी इथे, नाही खिंडीतला बाजी.

स्वराज्यात नाही पण दिल्ली दरबारात,
मराठी सरदार असतात बहुधा,
लाचार मराठी सरदारकीसाठी
जो तो आपल्यालाच बांधतोय गाठी,
मरत आहे मात्र स्वयंभू,
लाचार पळतात घराणे शाहीच्या पाठी.

गडावर बांधणी करताना आता,
पुन्हा धनाचे हंडे नाही मिळणार
खात्रीपूर्वक सागते बांगडया, बाटल्या
आणि चिंध्याच मिळणार.

आग्र्याला मदारी-हिरोजी, खरंच कोणी नाही थांबणार, बाल संभाजी सहित राजे तुम्हाला दगा फटका होणार. इथला प्रत्येक सरदार आपण आज स्वयंघोषित राजा आहे, तुम्ही जरी आलात तरी लाचार सर्व प्रजा आहे. अफजलाच्या समाधीला सरंक्षण,रयतेच्या पाठी लाठीचार्ज इथे नावालाच मराठा आहे. परराष्ट्रीय पोलीस वर्दी तुमची समाधी सांगाल का?

अजून मराठी बाणा आहे
रायगडावर नाही, पण अरबी समुद्रात
पुतळा बांधायचा विचार आहे.

हिंदू राजा शिवाजी फक्त, राजकारण्यांचा मराठी बाणा आहे. इथले सदरार बघाच एकदा, जो तो भलताच शहाणा आहे. होळी, रक्षाबंधन माहित नाही पण ३१ डिसेंबर आमचा सण आहे. दोनदा जन्मले होता का तुम्ही? तुमचे वाढदिवस दोन आहेत, किती बायका मुलींना तुम्ही चोळी, बांगडी दिली होती. आज ती देऊन दाखवाल? बाप सुध्दा विसरलाय नाती.

शिवाजी एक लुटेरा होता, इतिहासाच्या पुस्तकात वाचले होते, काय,काय कराल तलवारीने, इथे तर मशीनगन,बॉम्ब वापरले जातात. फितूर इथलाच असल्यावर गमिनी कावा कसा वापरणार? मावळे कसे शोधणार तुम्ही, इथे तर फिरंगी शाळा आहे. राम -कृष्ण नाहीत इथे फक्त टॉम आणि जेरीचाच लळा आहे. इस्ट इंडिया कंपनी बुडाली फिरंगी मात्र जोरात आहे, सरकार (लाच) नाही तर विरोधी पक्ष (लाच) त्यांची खैरात आहे. राजे काहीही करण्यापूर्वी तुम्हाला मावळा जोडावाच लागेल.तोही फुकट येणार नाही, ७वा वेतन आयोग द्यावा लागेल. तुमच्या पराक्रमाच्या मर्यादा शोधतो आम्ही, आमचे इतके सुपीक डोके आहे गदगदून

येतय सांगताना राजे.

आम्ही दुस–याच्या ताटाखालचे बोके आहोत. तुमची किंमत आज बघा दोन्ही जयंतीला कळेल, डिजेच्या तालावर नाचायला कुठलीही वाईन मिळेल. इथे शेती आहे अजून पण शेतकरी मात्र बुडाला आहे. निसर्ग, सरकार व महागाई यांनी मात्र पिडल आहे, एक मात्र ठळक आहे. सहयाद्री तग धरून आहे. उद्ध्वस्त गड बांधायला बिल्डर ट्रका भरून आहेत. न केलेला घोटाळा, पोलीस तुमच्या माथी मारतील. मांडवली नाही केली तर चौकशी आयोग नेमतील आणि तुमच्यावर इथे आरोप करतील की तुम्ही भ्रष्टाचारी आहात. म्हणून म्हणते राजे नका येवू पुन्हा इथे कारण खरंच तुम्ही खूप महान आहात..... खूप महान.

*****



– पवार योगेश
बी.एस्सी. २

# आई –वडिल

नात असतं मायेचं
आई –वडिलांच्या छायेचं
नाही ते दुखवायचं
आयुष्यभर टिकवायचं.

साऱ्या मुला–मुलींना
ज्यांनी प्रेम दयायचं,
त्यांना कमरेत लाथ घालून
बाहेर नाही काढायचं.

जीवनात प्रेमानं लढायचं
वाटल्यास लग्न नाही करायचं,
सार्थक आपल्या जीवनाचं
यातच हो मानायचं.

आई–वडिलांना सदैव
परमेश्वर मानायचं, परमेश्वर मानायचं.

– तेजश्री पाटील
बी. ए.– १

# प्रत्येकालाच शिवाजी व्हाव लागेल......

- नेताजी साताप्पा
बी. ए. भाग -

''महाराष्ट्राच्या मातीमध्ये काळरात्र आली होती माजला होता अंधार सारा घुबडं गोळा झाली होती रान सगळं पेटून उठेल, अशी कुठच ठिणगी नव्हती काळ होता बाका भोवती काफरांची गर्दी होती एक तूफान उठलं तेव्हा लखलखली हजार पाती राजे तुम्ही नसता तर......

पोरकी झाली असती माती''

लाख मेले तरी चालतील पण लाखांचा पोशिंदा जगला पाहिजे. राजे लाख मेले तरी चाललं असतं,पण पोशिंदाच आज लाथ मारत येत.....जायचं कुठं.....? विदर्भ मराठवाडा, कोकण, खानदेश,प.महाराष्ट्र एका तलवारींच्या टोकावर उभी राहतील अशी तलवार आज नाही. भ्रष्टाचारानं सडलेली मस्तकं कलम करण्याइतकी कुणाच्यातच धार नाही म्हणून राजे आज तुमची आठवण येते.कधी कधी वाटतं राजे आपण पुन्हा जन्मास यावं.

राजे तुम्ही पुन्हा जन्माला याल ही, पुन्हा तलवार हाती घ्यालही पण आता हुकुमत शस्त्रांची नाही वस्त्रांची चालते.... खाकी आणि खादी ! पण हेही चढवून राज्य एकाच छत्राखाली येईलचं असं नाही. त्यासाठी दिल्ली दरबारी राबता पाहीजे.यासाठी शरीर कमरेतून वाकलं पाहीजे आणि हे आपणास कदापी जमणार नाही. राजे तुम्ही पुन्हा जन्मास यालही स्वराज्याची शपथ घ्यालही,पण तुम्हाला बाजी, तानाजी नाहीत मिळणार यासाठी पेपरात जाहिरात दयावी लागेल, भरपूर पगाराची गॅरंटी दयावी लागेल, त्या मिळालाच एखादा योग्य पात्रतेचा मावळा तर म्हणेल, 'तुम्ही करताय ते सरकार मान्य आहे का मला त्यात फ्युचर आहे का......? राजे कार्हीन तुमचे ध्येय आवडेलही तुम्ही स्वराज निर्मा करायला जालही, पण त्यातही लोक भागीदा मागतील.

राजे तुम्ही पुन्हा जन्माला आलात त किल्ले बांधू नका; लोकांची ढासळलेली म बांधा. व्यसनामुळं कोसळलेला तरूण बुरूज उभ करा, काही बांधावसं वाटलं तर गरीबांना निवा अंग टेकवता येईल अशी हक्काची घरं बांधा प त्यासाठी तुम्हाला जागा मिळणं अवघड आहे रा कारण जागा आता स्क्वेअर फुटात मिळतात. मो मोठे मंत्री सुद्धा शहिदांसाठी बांधलेल्या घरा राहतात.

राजे तुमच्या राज्यात माणसाला जात नव्हत म्हणून शिवा काशिद धावून आला, जिवा महा पाठीराखा झाला. पण आज राजे महापुरूषां जातीपातीत वाटलय. तुम्ही जे मराठी राज्य जन्मा घातलं, त्याच मराठी माणसानं, तुम्हाला तीन तीनदा जन्माला घातलं..... राजे तुमच्या जयं शिवाय तुम्हाला आठवावं एवढा टचटचून गर्व मराठी मातीत आता उरलाय कुठं? घोषणांसा आणि शोषणांसाठी आवळतात मराठी मुठी... राजे मस्तकात महाराष्ट्र धर्म आता, उरल कुठं.....!

राजे तुम्ही जन्माला या किंवा येऊ नका, पणं तुमच्या सारख्या पराक्रमी राजा होऊन गेला याचा आम्हाला विसर कदापिही पडू नये......राजे तुमचा इतिहास इतिहासजमा होण्याचं पाप आमच्या पिढीच्या माथी येऊ नये. तुमचं कर्तृत्व आणि पराक्रम आमच्या पिढीला विचारातून जागवावा ....... गाजवावा लागेल. राजे तुम्हास आमच्या भावनेचं प्रतिक न बनविता कर्तव्याचं प्रतिक बनवावं लागेल..... आता प्रत्येकालाच शिवाजी व्हावं लागेल.....

''जागवारे पुन्हा तेच किल्ले शिवबाचे,
लढवारे पुन्हा तेच तोफे रायबाचे.....
तुम्हीच शिलेदार आता या हिंद प्रांताचे,
सजवारे पुन्हा रथ माझ्या शिवबाचे.....!'

****



— पवार योगेश
बी.एस्सी. २

# क्या बात है....!!

आपल्या आयूष्यात घडणारे प्रत्येक चांगले क्षण
आणि ती वेळ आपल्याला थांबवता आली
आसती तर
''क्या बात है''........!
सूंदर फूलपाखरा सारखं आपलं ही
आयूष्य असं तर
चार दिवसांचं पण स्वर्गाहून सूंदर, स्वच्छंद
''क्या बात है''........!
काही लोक स्वार्थासाठी मला
शोधतात पण
निस्वार्थी पणे कोणी शोधत आलं तर
''क्या बात है''........!
स्वप्नात अनेक छान गोष्टी पूर्ण होतात.
पण त्या गोष्टी ख-या आयुष्यात पूर्ण
झाल्या असतया तर,
''क्या बात है''........!
सोबत असेपर्यंत जर सगळयांना मी असवत ठेवीन पण मी गेल्यानंतर ही ते हसत राहिले तर ''क्या बात है''........!

– कु. पूजा महिपती भिऊंगडे
बी. ए. ३

# सांग ना गं आई,
# काय असतो हा बलात्कार !

- कु. तेजस्विनी द. घो...
बी. फार्म...

तुझी रिंकु.....

घरचा अभ्यास करून मी खाली खेळायला गेले सांग सांग भोलानाथ पाऊस पडेल काय? हे गाणं म्हणुन दाखवल्याने आई तु मला बक्षीसही दिलेस,

मी आणि सायली दिवाळीसाठी किल्ले बनवत होतो, आमचे कपडे, हात आणि छोटसं नाकही मातीन भरलं होतं.

तेवढयात मदन काका तिथे आले. हसत म्हणाले कायं बरंः.. चाललय? मी म्हणाले काका आम्ही किल्ले बनवतोय आणि सायलीचे पण अंग चिखलाने मळलय....

सायली तु थांब, तु चॉकलेट खाल्लस नां, आता मी छकुलीला देतो, अस्स म्हणुन मला काका घरी घेऊन गेले आणि मी घरात शिरल्यावर पटकन दारही बंद केले.

मी चॉकलेट खाण्यात गुंग असताना ते मला म्हणाले मी तुला नवीन ड्रेस आणलाय, तो तु घाल.... आणि असे म्हणत, त्यांनी माझे कपडे काढले आणि अचानक माझे तोंड दाबुन जमिनीवर पाडले.

काका, अहो काका सोडा ना मला, म्हणुन मी रडत होते, गप्प बस नाही तर मारेन म्हणुन ते माझ्यावर ओरडत होते अचानक झालेल्या वेदना सहन झाल्या नाहीत तेव्हा आई मला तुझीच आठवण आली, आता आई प्रतिकार करण्याची माझी ताकदही संपली होती. अचानक म... काकांनी माझ्या नाका तोंडावर उशी दाबली. आ... सर्दी झाल्यावर श्वास घ्यायला कसा त्रास होतो ना... तसंच वाटतं होत गं... घरातल्या भिंती... राक्षसासारख्या भिती दाखवत होत्या, शेवटी मी... उशीच्या आतचं हंबरडा फोडला आणि तुझा... चेहरा डोळयासमोर ठेवून मी शेवटचा श्वास... सोडला....

आई मदन काकांनी असं का गं केलं? मी... तर त्यांच्या सायलीचे फटाकेही घेतले नव्हते... तिच्या वाटणीचे चॉकलेटही नाही खाल्ले, मग का... असे वागले ते माझ्याबरोबर ?

आई, तुला आठवतं का गं, एकदा... कढईतल्या गरम तेलाचा थेंब माझ्या हातावर पडला... होता तेव्हा तू रडली होतीस. पण आज तर माझं... संपूर्ण शरीर जळालं पण तू हाक ऐकली नाहीस....

आज दोन दिवस झाले तू आणि बाबा, मामा, आजी सगळे रडताय. मी तुम्हांला हाक... मारतोय पण तुम्ही लक्षच देत नाहिये. आई बर्थ-डे... ला तू माझ्या गळात हार घालशीलच पण आज... माझ्या फोटोला का हार घातला आहेस गं? आज... तर माझा बर्थ-डे पण नाही, सगळेजण तुला... म्हणतात, तुमची मुलगी देवा घरी गेली. पण... आईः.... देवाघरी जायला मदन काकांनी दिलेल्या... वेदनासारखा त्रास सहन करावा लागतो का गं?

आई मी तुला कधीपासुन ओरडून-

ओरडून सांगतेय, पण तु काही काही ऐकतच नाहीस, फक्त रडत बसलीयेस आता माझा घसा पण सुखलाय मला थोडं पाणी देशील का गं? ग्लासात नको माझ्या वॉटर बॅगमध्येच दे.

आई मला तुझ्या कुशीत यायचय....

पण मी आता तुझ्याकडे नाही येवू शकत. पण माझी सगळी खेळणी सायलीला दे आणि हो.... तिला सांग मदन काका म्हणजे तिच्या पप्पांकडुन चॉकलेट नको घेऊ हं.... नाहीतर ते तिलापण दुखवतील आणि उशीने तोंड दाबुन देवाघरी पाठवतील,आई शेजारच्या काकू बघना आप-आपसात बोलत असतात.......

'अंग-तिच्या मुलीवर बलात्कार झालाय?

'सांग ना गं आई काय असतो हा बलात्कार?

'सांग ना गं आई काय असतो हा बलात्कार?

****



**– शिंदे विनायक**
बी.एस्सी. २

# अशीही वटपौर्णिमा

सावित्रीच्या कथेतून वडाच्या झाडांचे पर्यायाने पर्यावरणाचे रक्षण व्हावे ही पुर्वजांनी सुरू केलेली आपली परंपरा आहे. तथापि आज श्रद्धेचा चुकीचा अर्थ लावल्यामुळे ही श्रद्धा वडाच्या जीवावर उठली आहे. असे म्हंटल्यास वावगे ठरणार नाही. आज वटपौर्णिमेला वडाच्या फांद्यासाठी झाडांची अक्षरशः कत्तल केली जाते. वडाच्या झाडाभोवती दोरे गुंडाळून त्यांची घुसमट केली जाते यापेक्षा आजच्या काळाला अनुसरून समाजातील महिलांनी एकत्र येऊन वडाच्या झाडांची लागवड करावी व त्याची जोपासना करावी. आजच्या काळात वडाची झाडे लावून मिळणारे पुण्य अधिक मोठे ठरेल असे मला वाटते.

महिलांनी ही मानसिकता परस्परांच्या मनात रूजवली पाहिजे व त्याचा प्रसार करायला हवा. हळदी, कुंकवासारखे समारंभात सर्वांनी एकत्र येऊन झाडांची रोपे देऊन साजरे करण्याची जबाबदार दयायला हवी तरच पर्यावरणाचे रक्षण होईल. म्हणूनच जबाबदारी दयायला हवी तरच पर्यावरणाचे रक्षण होईल. म्हणूनच वटपौर्णिमेच्या दिवशी प्रत्येकाने एकतरी झाड लावावे.

झाडे लावा झाडे जगवा
झाडे जगवाल तर तुम्ही जगाल

**– स्नेहल मुळीक**
बी. एस्सी ३

# भूक (कथा)

– कु. पालकर पूजा विला
बी. एस्सी.

रामपूर नावाचं एक गाव होतं. गावात पाटलांचा भलामोठा वाडा होता या वाडयात रामू नावाचा एक पोरगा काम करायचा. तो अनाथ होता. पडेल ते काम करायचा व पोट भरायचा.

आज रामू पहाटे लवकर उठला. त्यानं जनावराचं शेण काढलं, गोठा साफ केला आन् त्यांच्या धाराबी काढल्या. शेतावर जाऊन वैरण घेऊन आला, त्यांना ती घातली. मग आपलं हात-पाय तोंड धुवून वाडयाच्या पायरीजवळ एका चहाच्या घोटासाठी बसला. पण कुठलं काय? आज त्याच्या नशीबात चहा नव्हताच मुळी. कारण आज वाडयावर पाटलांची त्यांच्या मंडळीसोबत बैठक होती. त्यामुळं वाडयात बरीच गडबड चालू होती. रामूला असाच बसलेला पाहून पाटलीणबाईचं पित्त खवळलं. तिनं लगेच त्याच्यासमोर पाण्याच्या घागरी नेऊन आदळल्या, ''आरं, ये राम्या असा बघतोस काय? या घागरी भरून पाणी घेवून ये, नुसता बसून काय रहातोस? तुला काय कामधंदा नाय?'' पहाटंचं कोवळं ऊन कवाच नाहीसं झालं होतं. आता पाणी आणल्याशिवाय रामूला कायच पर्याय नव्हता. गाव तसं समृध्द होतं पण गावाला पाण्यासाठी कायमचं भटकावं लागयचं. मैलोनमैल अंतर तुडवत रामू पाणी आणण्यासाठी निघाला. हळूहळू दुपार हो होती, उन्हं डोक्यावर येत होती. काटयाकुटयां भरलेली पायवाट तुडवट उपाशी पोटी रामू तसा चालत राहीला. मग पाण्याचा थांगपत्ता लागल्याव पाणी भरून तो माघारी येत होता. डोक्यावर ऊन पायात दगडधोंडे, काटेकुटे आश्या परिस्थितीत राम भुकेच्या तंद्रीत चालत होता. अचानक काळजा धस्स झालं. खांदयावरची घागर सावरत रामूची नज त्याच्या पायाकडं गेली. पायातून भळाभळा रक्त वाहत होतं. पायात असंख्य वेदना होत होत्या मग त्यानं पाहिलं तर बाभळीचा एक मोठा काट त्याच्या पायातून आरपार घुसला होता. तश्याच घागरी खाली टेकत त्यानं तो काटा काढला आणि त्याच्या डोळयात आसवांची धार लागली.

पण तशाही स्थितीत आपल्याला पाणी आणण्यासाठी बराच वेळ झाल्याचं पाहून तो लगबगीनं वाडयाकडं चालला. रक्ताळलेला पाय घेवून तीच पायवाट पुन्हा तुडवली व शेवटी तो पाटलीणीसमोर उभा राहिला. पोटातील भुकुने त त्याला काही सुचत नव्हतं म्हणून त्यान पाटलीणील विचारलं, ''आईसाहेब, लइ येळ झाला हाय, भूक लागलीया तवा एखादी भाकर मिळंल?'' ''आरं ये मेल्या सदान्कदा खातच असतोस आरं आधी ह

मंडळी आल्यात त्यांना काय पाहिजे नको ते बघ, हे अजून इथंच तांदळाचं पोतं हाय बघ, ते तेवढं खाली माजघरात नेऊन ठेव, आणि हे बघ मंडळी जेवू दयात मग तुझं बघू.'' आज पाटलांच्या वाडयावर जंगी पार्टी होती त्यामुळं सगळया वाडयाभर मटणाच्या रस्स्याचा, मसाल्याच्या भाताचा वास घमघमीत सुटला होता. या वासानं तर त्याची भूक त्याला स्वस्थ बसू देत नव्हती, आधीच आदल्या रात्री रामूला आजच्या तयारीमूळं नीट खायला मिळालं नव्हतं. त्यात आज सकाळपासून बरीच काम त्यानं आटोपली होती आणि आत्ताही तो कामचं आटोपत होता. सगळी कामं झाल्यावर पुन्हा रामू याचकासारखा पाटलीणीकडं भाकरीसाठी गेला. पण पाटलीणीनं त्याला उत्तर दिलं,''आरं, राम्या लइच येळ केलास बघ, नुकतंच उरलेल्या भाकरी त्या मागांच्या पोरी घेवून गेल्या, आता कायबी शिल्लक नाय. तवा तू कुठं गावात कोण काय देतंय का ते बघ'' रामू खूप उदास झाला. तसाच खाली मान घालून गावात गेला आनं भाकरीसाठी दारोदार भटकला. पण कुणीच त्याला भीक घातली नाही. प्रत्येकजण एकच उत्तर दयायचा, '' आरं, आज तर वाडयावर जंगी पार्टी आनं तू इथं मागत हिंडतोयास, सकाळपासनं चारदा चरला असशील, आन् पुन्यांदा आमच्या दाराला कशाला आलास ?''

रामू तसाच रडवेल्या चेहऱ्यानं पुढं चालत चालत आला. त्याला तिथं एक झोपडी दिसली त्या झोपडीत एक आजी राहात होती. शेवटचा प्रयत्न म्हणून तो तिथं गेला.'' कोण हाय का घरात?''हाय,हाय मी शांताक्का'' त्यावर रामू रडतच रडतच म्हणाला,''आजी मी कालपासनं उपाशी हाय. पोटात अन्नाचा कण नाय. पाटलीणीनं सकाळपासनं काम करवून घेतलं. पण पोटाला पोटभर भाकर पण नाय दिली. तुझ्याजवळ भाकर असेल तर मला देशील का खायला?'' त्यावर ती गरीब म्हातारी म्हणाली '' घे रं लेकरा घे ! पण ही इथं खावू नगसं. माझ्या मालकानं बघितलं तर माझ्यासकट तुला बी शिव्या घालंल. जा कुठतरी आडबंगलला जाऊन खा.''

रामूला हातात भाकर मिळताच पराकोटीचा आनंद झाला. ती भाकरी घेवून पळत पळतच तो पाटलांच्या वाडयाजवळ आला. नुकतीच पाटलांच्या घरची पाहुणेमंडळी पाटलांच्या खोलीत पान-सुपारी खात चर्चा करत बसली होती. त्याच वेळी रामू त्या खोलीच्या खिडकीजवळ भाकरी खाण्यासाठी बसला. हापापलेला जीव त्या भाकरीकडे टकमक पाहत होता. तो भाकरी तोंडाला लावणार तोच खिडकीतून लाला पिचकारी उडाली. पाहुण्यांपैकीच कुणीतरी एकाने पान-सुपारी खाऊन आपली थुंकी खिडकीतून बाहेर टाकली होती. रामू फक्त त्या भाकरीकडे बघतच राहिला होता. कारण त्याला आता एवढंच दिसत होतं की, त्याची भाकरीही लालेलाल अन् भुकही लालेलाल !

*****

# वडीलांस पत्र

– कुणाल वसंत फाळ
बी. एस्सी. भाग -

प्रिय बाबा,

आज थोड एकटं एकटं वाटलं,

बाकी काही नाही, तुमची आठवण आली म्हणून जरा बोलावसं वाटलं....

चालायला लागल्यावर तुम्हीच पहिला हात दिला होतात,

पण मी पुढे गेल्यावर नकळतच कधी दूर गेला होतात.

आज स्वतःच्या पायावर उभा असलो तरी धडपडल्यासारखं वाटलं

बाकी काही नाही, तुमची आठवण आली म्हणून जरा बोलावस वाटल.

जेवताना काऊचिऊशिवाय कधी घास पोटात गेला नाही.

आता तर चिऊबघायला सुद्‌धा मिळत नाही,

काऊचिऊसाठी पुन्हा एकदा रूसावस वाटलं

बाकी काही नाही तुमची आठवण आली.

लहानपणी तुमच्यासोबत पावसात भिजताना खुप मजा वाटायची.

फाटका रेनकोट, तुटकी छत्री असूनही ती दोघांना पुरायची.

आज नवी कोरी छत्री असूनही पावसात थोडं भिजावस वाटलं

बाकी काही नाही, तुमची आठवण आली म्हणून जरा बोलावस वाटलं.

आठवतय... एकदा मी पडलो होतो, मला ग लागल होतं

त्यादिवशी तर पूर्ण आभाळ तुमच्या डोळयात दा होत

आज,उगाचंच अडखळून पडावसं वाटलं

बाकी काही नाही, तुमची आठवण आली म्हण जरा बोलावसं वाटलं

रात्री झोपताना तुमची मांडीच माझी 'उश असायची

तुम्ही नसताना आईच्या कुशीतही झोप नसायची,

आज, पुन्हा एकदा तुमच्या जवळ झोपाव वाटलं...

बाकी काही नाही, तुमची आठवण आली म्हण जरा बोलावसं वाटलं.

तुमची आठवण मनातून कधीच जाऊ शकली नाह

आज भरलेल्या आभाळाबरोबर डोळयात पा दाटल्यासारखं वाटलं.

बाकी काही नाही, तुमची आठवण झाली म्हण जरा बोलावसं वाटलं.

*****

# आपलं माणूस कायमचं जाण्यापूर्वी......

– कु. दिपाली फराकटे
बी. एस्सी.-३

फक्त एकदाच....
आपली माणसं आपल्याला कायमची सोडून जाण्यापूर्वी.
फक्त एकदा तरी
हाक मारा त्यांना....
प्लीज....!

आपण म्हणतो,
मीच का नेहमी फोन करायचा,
मीच का एसएमएस करू,
आणि कधीतरी जिवाभावाचं माणूस अशा ठिकाणी निघून जातं,
जिथें नेटवर्क पोहचत नाही,
आपलं माणूस नॉट रिचेबल होण्यापूर्वी,
एक फोन कराल त्यांना...
प्लीज ....!

आपण असतो फार बीझी,
वेळच नाही.
कुठं जायला फुरसत नाही,
जीवाभावाची माणसं आठवतसुध्दा नाहीत.
आपण कधी पत्र लिहित नाही,
ख्यालीखुशाली विचारत नाही,
त्यांचे बर्थडे आपल्याला आवडत नाही,
त्यांच्या आठवनी मन काहूर करत नाही,
आणि मग एक दिवस येतो निरोप,
ते 'नसल्याचा'..
आणि जातो फक्त दारावर,
कधीही न होणाऱ्या भेटीसाठी...
असं होण्यापेक्षा
कधीतरी पाच मिनीट वेळ काढता नाही का येणार?
थोडावेळ भेटून गप्पा मारता नाहीच का येणार?
प्लीज.... त्या गप्पांना वेळ द्याच...
प्लीज...!
हे सारं कळतं आपल्याला,
पटतंही...
मात्र तरीही आपण आपल्याच आयुष्यात बांधलेले,
आपले दोर काचलेले....
त्या काचलेल्या दोरांपायी
कुणाशी शेवटची भेट झाली नाही
असं होऊनये...
आणि जिवंत असलेली माणस कायमची दुरावू नये.
म्हणून एकदाच...
मनापासून हाक माराल प्लीज...
आपल्या माणसांना....

## तीन गोष्टी

तीन गोष्टींचे कधीच विस्मरण होऊदेऊनये
कर्तव्य,कर्ज, उपकार ।
तीन गोष्टींपासून नेहमी दुर रहावे
व्यसन,जुगार, चोरी ।
तीन गोष्टी इतरांना देत चला
दान,ज्ञान, मान ।
तीन गोष्टींचा नेहमी आदर करावा
आई,वडिल, गुरू ।
तीन गोष्टीं भावाभावात शत्रुत्व निर्माण करतात

संपत्ती,पत्नी,जमीन ।
तीन गोष्टींची कधीच चोरी होत नाही

चारित्र्य,ज्ञान,जिद्द ।
तीन गोष्टी अंगी असु दयाव्यात

नम्रता,सौजन्य,सुस्वभाव ।
तीन गोष्टी आयुष्यात एकदाच मिळतात
आई, वडिल, तारूण्य ।
तीन गोष्टी सांगून येत नाहीत

वेळ,आजार,मृत्यु ।
तीन गोष्टी निघून गेल्यावर परत येत नाहीत
तोंडातून शब्द, धनुष्यातून बाण, शरिरातून प्राण !

**– कु. कोमल शिवाजी पाटील**
बी. एस्सी. २

## नशीब

जी माणस हवीशी वाटतात
ती माणसं भेटत नाहीत,
जी माणसं नकोशी वाटतात
त्यांचा सहवास संपत नाही,
ज्यांच्याकडे जावेसे वाटते
त्यांच्याकडे जायला जमत नाही,
ज्यांच्याकडे जाऊनये असे वाटते.
त्यांच्याकडे जावेच लागते.
जेव्हा जीवन नकोसे वाटते
तेव्हा काळ संपत नाही
जेव्हा जीवनाचा खरा अर्थ कळतो
तेव्हा काळ संपलेला असतो.
नशीब हे असंच असतं
त्याच्याशी जपून वागावं लागतं
तिथे कोणाचेच चालत नाही
जिकडे नेईल तिकडे जावच लागत.

**– कु. सायली रविंद्र साम**
बी. एस्सी. भाग

## गणित

कधी वाटते या जीवनाचे गणित
आपल्याला कधी कळलेच नाही की काय ?
आवडीच्या माणसांशी आपले सूर
जुळलेच नाहीत की काय ?
बेरीज करायची होती नात्यांची
पण चुकतच गेली सदा न कदा
'गुणाकार' करायचा होता प्रेमाचा
पण साथ नाही मिळाली गुणकाची
मग उत्तरच नाही आले मनासारखे
'भागाकार' केला दुःखाचा
पण किती भागले तरी उत्तर 'शून्य'नाहीच
'वजाबाकीने'मात्र सदा साथ दिली
जीवनाच्या प्रवासात किती माणसे 'वजा' होत गेली
पत्ताच नाही लागला
असे हे 'गणित' सदा चुकतच गेले
'सुटले' वाटता वाटता अवघडच राहिले'!!!

**– कु. सुवर्णा साताप्पा फराकटे**
बी. एस्सी.-२

## आयुष्य

मी जेव्हा मरून जाईल तेव्हा मला जाळू नकोस
आयुष्यभर जळत होतो, आणखी चटके देऊनकोस

जेव्हा माझा अंत होईल, तेव्हा मात्र रडू नकोस
जन्मभर मी रडत होतो, शेवटी रडणे ऐकवू नकोस
माझ्या शरीराचे ओझे तू खांदयावर घेऊनकोस

आयुष्यभर ओझे मी वाहिले,
उपकाराचे ओझे ठेऊनकोस

माझ्या निष्पाप देहावर तू फुले वाहू नकोस
माझ्या वेदनांचा गंध फुलांच्या वासात दडवू नकोस

माझ्या देहाच्या मातीला शेवटी
तू नमस्कार करू नकोस

आयुष्यभर पायाखाली तुडवल,
शेवटी पायातू पडू नकोस.,

**– कु.प्राजक्ता प्रकाश पाटील**
बी. एस्सी. भाग-२

## मी मराठी .....!

मी मराठी आहे, कारण ३१ डिसेंबरला दणक्यात सेलिब्रेशन केलं, तरी गुढीपाडव्याला कपाळावर चंद्रकोर रेखुन, हातभर बांगडया घालून, जिभेवर कडू-गोड गोळीची चव चाखत मनापासून नवीन वर्षाचे स्वागत करते !!

मी मराठी आहे, कारण कॉलेजमधून येताना टाईमपास मंचुरियन खाऊन आले, तरी वरण-भात आणि साजुक तुपाशिवाय माझं भागत नाही...

मी मराठी आहे, कारण रिकी मार्टिनच्या गाण्यावर माझे पाय थिरकले तरी बाबुजींचे तोच चंद्रमा नभात' ऐकल्यावर नकळतच तोंडातून 'वाह' निघुन जातं....

आम्ही मराठी आहोत, कारण कितीही इम्पोर्टेड कॉस्मेटिक्स परफ्युम्स वापरले तरी उठण्याशिवाय टिपिकल चंदन साबणाशिवाय आमची दिवाळीच साजरी होवू शकत नाही...

आम्ही मराठी आहोत, कारण अत्याधुनिक होम ॲप्लायन्सेसने घर सजवलं तरी दाराला झेंडुच्या फुलांच आणि आंब्याच्या पानाचं तोरण लावल्याशिवाय आमचं समाधान होत नाही...

जात कोणतीही असो, आम्ही महाराष्ट्रीयन आहोत...आणि आमच्यातलं मराठीपण सगळीकडं तेच आहे.

माझ्यातलं मराठीपण जोपासण्याची मला आवश्यकता नाही,

कारण ते मराठीपण माझ्या रक्तात भिनलंय....आणि या मराठीपणाचा मला अभिमान आहे.....।।

**- कु.रोहिणी मारूती ताशिलदार**
बी. एस्सी. भाग ३

## दंगा

तुमचा आणि आमचा कसला आलाय वांदा
आणि कशाला करताय मोकळाच दंगा ? ।।धृ।।
मी राम आणि तु रहीम
कोनी भरला हा मनात वहीम
सांजच्या भाकरीची पंचायत
सगळयाच इथं माणसांच्या रांगा ।।१।।
गुजरात मध्ये झालाय दंगा
आणि तुम्ही इथं बंद म्हणून सांगा
अहो करणारी करत्यात मरणारी मरत्यात
तुमा आमा गरीबांच हाल किती सांगा ?।२।।
कारगीलला बी तेच झालंय
आणि काश्मिरलाही तचे होतंय
रोजच्या मडयाला कोण रडलं सांगा ? ।।३।।
आरे झालयं ते झालयं खूप झालयं
त्या पाकिस्तानला गप्प बसाय सांगा
आमच्या आमच्यात भांडान लावतयं
त्याच्या मुंडक्याव सुरी टांगा
अनं कशाला करताय मोकळाच दंगा ?।।४।।

**- कु. पौर्णिमा हिंदूराव गौड**
बी. ए. भाग-२

# आणखी काय हव सांगा...

एक चहा एक कटिंग
एक पिक्चर तोपण मोबाईल स्क्रिनिंगवर
आणखी काय हव सांगा एका मित्राकडून.....
एकच कठोर नजर ती पण ह्रदयावर दगड ठेवुन
एकच कठोर वाक्य ते पण घोगऱ्या आवाजातुन
पाठीवरती एकच थाप ती पण आपली प्रगती पाहून
आणखी काय हव सांगा एका वडिलांकडून.....
मायेची एकच थाप ती पण कुरवाळून
चोरून ठेवलेली एकच पोळी ती पण तुप लावुन
एकच आशिर्वाद तो पण डोळ्यात पाणी आणुन
आणखी काय हव सांगा एका आईकडून.....
एकच तास मनमोकळेपणान
थोडी मजा थोडी मस्ती पण वेळेच भाण ठेवुन
एकच तास कठोरपणे तो पण मुल पास व्हावी म्हणून
आणखी काय हव सांगा एका शिक्षकाकडून ....
एक नजर प्रेमाची अगदि निस्वार्थपणे
काहीही न देता एक छोटासा गजरा देण
पण तो ही प्रेमाणे
कुठलाच स्वार्थ न ठेवता भेटणे ते पण मनापासून
आणखी काय हव सांगा एका प्रियकराकडून....
सगळयांनी खूप काही दिल न मागून
स्वर्गच मिळाला मला अगदि मन भरून
विश्वास नाही ठेवणार मी कधी कुणावर
तो पण डोळे झाकुन
आणखी काय हव सांगा
आपल्याला आपल्या आयुष्याकडून.....

**– नम्रता मारूती पाटील**
बी. ए. –२

# आयुष्य

जीवन आहे एक रम्य पहाट
संकटानी गजबजलेली वादळवाट
सोनेरी क्षणांची एक आठवण
सुख–दुःखाचीच गोड साठवण.

प्रेमाच्या पाझरांची वाहती एक सरिता
नात्याच्या अतुट शब्दांनी गुंफलेली कविता
जाणीवेच्या पलिकडचं जगावेगळं गाव
यालाच तर आहे आयुष्य हे नाव....

**– कु. पुजा यशवंत पाटील**
बी. ए. भाग–३



**– गोसावी अर्जुन**
बी.ए. १

# बाप

बाप म्हणजे.....

कडकपणाच्या आवरणाखाली झुळझुळणारं पाणी असतं,

भल्यासाठी लेकरांच्या झगडणारं झाड असतं
हट्टासाठी पोरांच्या ओव्हरटाईम तो मारत असतो.
डोक्यावरती उन्हं झेलतं, सावली तो देत असतो
दणदणत्या पावसापासुन कुंटूब आपलं जपत असतो
घर निट चालवण्यासाठी स्वतः बाहेर फिरत असतो
आईच्या मउशार तळव्यामागचा तोच राकट हात असतो.

बाप कधी रडत नाही, बाप कधी खचत नाही
बाप कधी उतत नाही, नि बाप कधी मातत नाही.
पोरं सोडतात घरटं अन शोधू लागतात क्षितिजं नवी.

बाप मात्र धरून बसतो घरटयाची प्रत्येक काडी
पोरांच्या यशासोबत त्याचं मन हसतं असत
अपयश पचवताना, ते आतून रडत असतं
काही झालं, कितीही झालं, तरी कणाताठ असतो
खचलेल्या पोराला तोच तर उभारी देत असतो...

सारी कथा समजायला फार मोठं व्हावं लागतं
बापाचं मन, चटकन हाती लागत नसतं,
आकाशाहून भव्य अन् सागराची खोली असते,
बाप या शब्दाची महतीच मोठी न्यारी असते.

कळत नाही बापाचं मन स्वतःबाप झाल्याशिवाय
बाप माणूस असतो तो, बापाशिवाय क.. कळणार?
असंत न्यारचं रसायन, त्याची फोड उकलत नाही
म्हणून तर बापावर कविता कोणी करत नाही,
करणार कशी कविता कोण, तो त्यात मावत नाही.

चार ओळीत सांगण्यासारखा बाप काही लह नाही,
सोनचाफ्याचं फूल ते, सुगंध कधी कुपतं नाही
बाप नावाच्या देवाचा थांग कधी लागत नाही
केला आज थोडा सायास, त्याला थोडं शोधण्याचा
जमेल तेवढा सांगितला, आधार आमच्या आसण्याचा.

एक मात्र अगदी खरं, त्याच्या शिवाय जमत नाही
आई मार्फत बोललंत तरी, बोलल्या शिवाय राहव नाही
सांगतो आता शेवटंच, कान थोडा इकडे करा,
आभाळ पेलून धरण्यासाठी, आभाळाचा श्वास हवा,

बाप नावाच पारिजातकाचं, असचं काही जि असतं
ते समजून घेण्यासाठी बापच असणं भाग असतं.

– कु. सुप्रिया शहाजी संकपाळ
बी. ए. भाग ३

## शिरं टांगलेली झाडं

आरं कारं एकाएकी
मेघराजा असा रूसला ?
निसर्गाच्या खेळीपुढं
बळी राजा कसा फसला.
कुठं दडून बसला
काय झाली का रं चूक ?
पाण्याईना चाऱ्याविना
जनावारं मेल मूक.
पुढं डोंगर कर्जाचा
तुला नाही कारं भानं ?
डोळ्यातल्या पाण्यानबी
आता मिटना ही तहान
आता नाही सोसवत
पुरं झालं आता सारं
तुझ्याईना पिकं झाली
जशी आईविना पोरं.
पुरं करं आता ख्योळ
कायतरी इलाज की रं काढं
नाहीतर शेतात उरतील
शिरं टांगलेली झाडं
शिरं टांगलेली झाडं

**– स्वप्निल आनंदा कांबळे**
बी. एस्सी. भाग ३

## प्रेम म्हणजे...

प्रेम म्हणजे... ओठावरलं गाण असतं,
चांदण्यातल न्हाणं असतं
अकारण झुरण आणि माग–माग
फिरण असतं.
प्रेम म्हणजे....प्रेम असत.
आशा निराशेच्या झुल्यावर
व्यर्थपणे झुलण असत.
पाऊस नसला तरी चिंब–चिंब
भिजणं असते.
प्रे म म्हणजे... प्रेम असत.
डोळा चुकवून सर्वांचा
एकांतात भेटणे असते.
अन भेट नाही झाली की,
मुक्या–मुक्यान रडण असत.
प्रेम म्हणजे प्रेम असते.

**– रामचंद्र कृष्णात कांबळे**
बी. ए. भाग २

## 'शब्दशिल्प'

''कुणी चांगले म्हणावे
म्हणून
काम करू नका
आपण करित असलेल्या
कामाने
अनेकांचे भले होणार
असल्यास
ते काम सोडूच नका
आणि
प्रामाणिक असेल तर...
आपल्यावर टिका
करणाऱ्यांच्या
टिकेला काहीच महत्व
नसते.
चांगल्या कर्माची फळे
चांगलीच असतात.
मुखातुन गेलेला राम
आणिं
निस्वार्थपणे केलेले
काम
कधीही व्यर्थ जात
नाही.''!

**– कु. तेजश्री सुनिल चौगले**
बी. ए. भाग १

## काय विसरलो ?
## सुखाच्या खोलीची चावी विसरलो.

दारात गाडी आली, आम्ही चालण विसरलो
पायाला चाकं लागली आम्ही थांबण विसरलो.

हातात कॅलक्युलेटर आला, आम्ही पाढे विसरलो
शहराची हवा लागली, आम्ही खेडे विसरलो.

घरामध्ये A.C आला, आम्ही झाडाखालचा गारवा विसरलो
फास्टफूडच्या जमान्यात मळयातलं माळवं विसरलो.

घरामध्ये टी.व्ही.आला, आम्ही बोलणं विसरलो
गिरणीच पीठ खाऊन, आम्ही आईची ओवी विसरलो.

खरं सांगतो मित्रांनो,
आपण सुखाच्या खोलीची चावी विसरलो.

**– प्रफुल्ल तानाजी पाटील**
बी. एस्सी. भाग १

## असं एक प्रेम......

उदास होऊ नकोस
मला हसता येणार नाही,
हृदय तोडू नकोस
मला जोडता येणार नाही.
आठवणीन मध्ये छळू नकोस
मला सावरता येणार नाही
साथ कधी सोडू नकोस
तुला कधी सोडता येणार नाही.
रूसवा धरू नकोस
मला शब्द सापडणार नाही
एकटं मला सोडू नकोस
आपल असं मला कोणी नाही
गुंतलेल हृदय मोडू नकोस
मला परत गुंतता येणार नाही
तुझ्याशिवाय जीवनात अर्थ नाही
असं मी म्हणतं नाही
कारण
तुझ्याशिवाय माझ्यात जीवच राहणार नाही.

**– कु. अनिकेत जितकर**
बी. एस्सी. भाग १

## मोबाईल

मोबाईलनं माणसाशी नात खरखुर जडवलय
काही घडवलय काही बिघडवलय.
लहानथोर माणस हल्ली रेंजमध्ये असतात
मोबाईल नसलेल्या माणसाला
लोक अलिकडे हसतात.
नवऱ्यापेक्षा मोबाईल प्राणप्रिय वाटू लागला
अन् डोरल्यासोबत मोबाईल
गळयामध्ये लटकू लागला.
मोबाईलच्या अतिवापरान आक्रित अस घडू लागल
नुकतच जन्मलेल पोरसुद्‌धा
रिंगटोन सारख रडू लागल.
नवरा बायकोत मोबाइलन वाद नवा पेटवलाय
चारचौघात बसणारा माणूस
माणसामधुन उठवलाय.
मोबाईलच्या गाण्याशिवाय कोणालाच डोलता येत नाही
तुमची शपथ, मनातल गुपीत
मोबाईलशिवाय बोलता येत नाही
झोपेतून उठवणारा मोबाईलचा आवाज गोड असतो
मोबाईलबंदी चा दुसरा अर्थ शांतता मोड असतो
भीती एवढीच वाटतेय की
माणसं मोबाईल वरती जगू लागतील
अन् मेल्यावरही अतृप्त आत्मे
मोबाईलभोवती भटकू लागतील.
मोबाइलनं माणसाशी नातं खरखुरं जडवलयं
काही घडवलय काही बिघडवलयं.

**– स्वप्नाली दत्तात्रय जाधव**
बी. एस्सी. भाग २

## ।। बाप कुणा कळत नाही ।।

संकटांना झेलत कुटुंबाला पेलत,
वाट कधी चुकत नाही....
का कुणास ठाऊक, बाप कुणा कळत नाही ।।१।।

चेहरा वर कठोर तरी,मन हळवं दाटलेलं.
पिलांवरची नजर काही हटत नाही,
का कुणास ठाऊक, बाप कुणा कळत नाही ।।२।।

नियतीनं फोडलं, दुःखात झोडलं तरी,
स्मित ओठावरच ढळत नाही,
का कुणास ठाऊक, बाप कुणा कळत नाही ।।३।।

जखम झाली की, आठवते आई,
बाप कधी स्मरत नाही,
दाटलेल्या भावनांना वाट कुणी करत नाही,
का कुणास ठाऊक, बाप कुणा कळत नाही ।।४।।

पिल्लं विखुरली की, तो शांत, निश्चल, आत्मकेंद्रित
संध्याकाळी घरट्यावरची नजर काही हटत नाही
का कुणास ठाऊक,बाप कुणा कळत नाही
का कुणास ठाऊक, बाप कुणा कळत नाही....

– कु.निलम शिवाजी पाटील
बी. एस्सी. भाग ३

## घराबाहेर...

"घराबाहेर पडून एकदा
बघ एकदा गडया
कळेल तुला मग
माझी वेडी कथा वेडया!
सकाळच्या घाईगर्दीत
विसरशील गरम चहा
क्षणानंतर बघशील घडयाळात
अरे, वाजलेत दहा!!!
दुपारची पोटातली भूक
'हाफ' चहाने भागवा
'अर्ध्या' भूकेला रात्रीपर्यंत
खूप जपून ठेवा !
दिवसभराची गडबड देईल
तुला संध्याकाळचा थकवा
मग, हळूच आठवणीत येईल,
घरट्यात परतणारा थवा.
दिवसावर कुरघोडी करत
रात्र लावील दिवा
झोप अशी कशी लागेल?
अर्ध्या डोळयांना जागवा !
कानाची सवय मोडा
आज अंगाईगीत नाही
मायेची ऊब देणारी
आईची प्रित नाही
जेव्हा गादीवरती लोळूनही
शांत झोप येत नाही
पाणावलेला डोळा माझा
अश्रूंना पीत राही !!!

– कु. कविता आनंदा कोंडेक
बी. एस्सी. भाग

## हॉस्टेल जीवन

हॉस्टेलचे जीवन फारच गमतीशीर
गोष्टी होतात फारच मजेशीर.
होस्टेलचे नियम सांगतात,
लवकर झोपा, लवकर उठा,
सर्वजण म्हणतात,
सावकाश झोपा, सावकाश उठा,
बाथरूम-बेसिनला असतात नंबर
लेक्चरला जावे पाणी मारून तोंडावर
उशीर होताच सरांनी हाकलून दयावे
मग कट्टयावर बसुन मुलींना पहावे
रूममध्ये तर फारच गप्पा रंगतात
प्रत्येकजण कान लावुन ऐकतात
हे सर असे, ते सर तसे
हे सर तर जशास तसे
कोणी सांगतो सिनेमाची कथा
कोणी गातो प्रेयसीची गाथा
तोंड दाबुन हसत सुटतो
कसा तरी दिवस जातो
असे आनंदी जीवन जगावे
एक तरी दिवस होस्टेलला रहावे.

**- कु.स्नेहा आप्पासो पाटील**
बी. एस्सी. भाग ३

## अवघड म्हणजे अशक्य नव्हे....!!!

सगळे म्हणतात शून्यातून सगळं निर्माण करणं अवघड असतं
पण त्याच्याही पलिकडे विचार करणारं क्वचित कोणी असतं.
स्वतःकडे काही नसताना स्वतःला 'शून्य' मानन‌ं सोपं असतं
पण सगळंकाही असताना 'शून्य' भासवणं अवघड असतं.
नेभळटाने नेभळटाला क्षमा करणं सोपं असतं.
बलवानाने दुर्बलाला दया दाखवणं अवघड असतं.
अनुकुल परिस्थितीत सत्कृत्य करणं सोपं असतं.
प्रतिकूल परिस्थितीत ते टिकवणं अवघड असतं.
थोडं करून प्रसिद्धी विन्मुख राहणं सोपं असतं.
सगळं स्वतः करून 'मी' ला सोडणं अवघड असतं.
आपल्याला समोर चांगलं म्हणणाऱ्याला मित्र म्हणणं सोपं असतं.
आपल्यासाठी काहीही करणारा मित्र ओळखणं अवघड असतं.
चांगल्या संगतीत चांगलं राहणं सोपं असतं.
दूषित वातावरणात 'चांगलेपणा' टिकवणं अवघड असतं.
हजारवेळा अपयश आलं तरी 'उठेन'म्हणणं सोपं असतं.
प्रत्यक्षात अपयशानंतर स्वतःला सावरणं अवघड असतं.
परंतु...
सोपं हे सोपंच,अवघड हे अवघडंच असतं
जरी सगळं अवघड असलं तरी 'अशक्य'मात्र काहीच नसतं.

**- कु. आसावरी उदय पाटील**
बी. एस्सी. भाग ३

# इंटरनेटवरील आयुष्य

Outdated झालयं आयुष्य
स्वप्नही Download होत नाही
संवेदनांना Virus लागलाय
दुःख Send करता येत नाही.

जुने पावसाळे उडून गेलेत
Delete झालेल्या File सारखे
अन् घर आता शांत असतं.
Range नसलेल्या Mobile सारखे.

Hang झालेल्या PC सारखी
मातीची स्थिती झाली वाईट
नातीगाती जोडणारी
कुठेच नाही Website.

एकविसाव्या शतकातली
पिढी भलतीच Cute
Contact list वाढत गेली
संवाद झाले Mute.

computer च्या chip सारखा
माणूस मनाने खुजा झाला
अन् Mother नावाचा Board
त्याच्या आयुष्यातून वजा झाला.

Floppy Disk Drive मध्ये
आता संस्कारांनाच जागा नाही
अन् फाटली मनं साधणारा
Internet वर धागा नाही.

विज्ञानाच्या गुलामगिरीत
केवढी मोठी चूक
रक्ताच्या नात्यांनाही
आता लागते
Facebook....Facebook....Facebook.

– अरूण एकनाथ पाटी
बी. एस्सी. भाग



– गोसावी अर्जु
बी.ए.

# बालिका वधू

पाखरांच्या धुंदीत गाते अजून गाणी,
अनोख्या जीवनाची अनोखी ही कहाणी ।।धृ।।
मैत्रिणीने जेवण सारे केले होते चिखल पाण्याचे
दारापुढती मांडले होते खेळ सारे भातुकलीचे
या मैत्रिणी न राहील्या, राहील्या फक्त आठवणी
अनोख्या जीवनाची अनोखी ही कहाणी ।। १।।

न शिकू दिले न खेळू दिले
संसाराचे ओझे पाठीवरती आले
बालवयातच माझी झाली सासरी रवानी
अनोख्या जीवनाची अनोखी ही कहाणी ।। २।।

अनोळखी होती घरातील प्रत्येक व्यक्ती
त्यांचे मन जिंकण्याची शोधून काढली युक्ती
म्हणून मिळाल्या मला सासरी प्रेमाच्या खाणी
अनोख्या जीवनाची अनोखी ही कहाणी ।। ३।।

नवऱ्याने दूर शिकायला जावून लग्न दुसरे केले
कोमलशा ह्रदयावर शंभर घाव घातले
त्याच्याकडून प्रेमाऐवजी मिळाले फक्त अश्रुंचे पाणी
अनोख्या जीवनाची अनोखी ही कहाणी ।।४।।

सासरी बनून राहीले घातकी कृष्णाची मीरा
पण जवळ मात्र आला सासर माझा सारा
बेचव जीवनाच्या दोऱ्यात ओविले सासूने प्रेमाचे मणी
अनोख्या जीवनाची अनोखी ही कहाणी ।।५।।

शरीर होते जिवंत मन होते मेले
मुलगी मानून सासऱ्याने जीवन मला दिले
पुन्हा एकदा लग्नाचा क्षण आला माझ्या जीवनी
अनोख्या जीवनाची अनोखी ही कहाणी ।।६।।

सासऱ्यांनी माझे कन्यादान केले
पहील्या सासरला माहेरचे स्वरूप प्राप्त झाले
सूखी ठेव माझ्या माहेरला हिच प्रार्थना ईश्वरचरणी
अनोख्या जीवनाची अनोखी ही कहाणी ।।७

**– कु. दमयंती दयानंद घारे**
बी. ए. भाग ३






**–सचिन सुतार**
बी.ए.३

## प्रयत्न

हार झाली आहे तुझी म्हणून तू रडू नकोस
प्रयत्न करायचे मात्र तू कधी सोडू नकोस.
पडून पडूनच मुल शिकतं उभे रहायला
चुकून चुकूनच शिकायचे असते जीवन जगायला.
कोणी कीती ही हिणवले तरी ध्येय तू सोडू नकोस
हार झाली आहे तूझी म्हणून तू रडू नकोस.
पडायचे प्रसंग तर येणारच चालताना
कित्येक ठोकर लागणार मार्ग नवा शोधताना.
कोणी कितीही फसवले तरी तू काही थांबू नकोस
हार झाली आहे तूझी म्हणून तू रडू नकोस.
चुकणार तर आहेसच नविन मार्ग शोधताना
ध्यानात ठेव प्रत्येक खुण मात्र तु चालताना.
अडकलास जरी कोठे तरी शांत तू बसू नकोस
हार झाली आहे. तुझी म्हणून तू रडू नकोस

**– कु. आश्विनी तुकाराम कांबळे**
बी. ए. भाग ३

## कन्यादान

घर झुकलेलं झाडं
फांदी –फांदी जिवापाड
भाव बंध मायरीत
त्याच्या मनात कवाडं.

लेक माहेराच सोनं
लेक सौख्याचे औक्षण
लेक बासरीची धुन
लेक अंगणी पैजन.

लेक चैतन्याचे रूप
लेक अल्लड चांदण
लेक रंगाच शिंपन
लेक गंध हळव मन.

लेक परक्याचे धन
बाबा तुटतो आतून
आला गोटलेला क्षण
शुभमंगल कन्यादान
शुभमंगल कन्यादान---

**– कु. रूपाली मोहन पाटील**
बी. ए. भाग ३

# आयुष्य खुप सुंदर आहे

आयुष्य खुप सुंदर आहे
ते फक्त अनुभवुन पहायला हव
स्वतःला बाजुला ठेवुन एक दिवस
इतरांसाठी जगुन पहायला हव.
रोजच दगदगीच आयुष्य जगतं असताना
त्यातुनही वेळ काढायला शिकायला हवं.
कितीही असला कामाचा व्याप तरी
एक दिवस स्वच्छंदि आयुष्य जगुन....
पहायला हव
आयुष्य खुप सुंदर आहे.
ते फक्त अनुभवुन पहायला हवं.
एकटेपणान एकट राहुन आयुष्य जगत
असताना
स्वतःचा एकटेपणा बाजुला ठेवुन दुसऱ्याचा
एकटेपणा दुर करायला शिकायला हवं
डोळयावर कितीही असला दुःखाचा डोंगर
तरी तो बाजुला सारून शिकायला हव
आपल्या यशाच्या मार्गातील काटे
दूर करून पहायला हव.
प्रत्येक वेळी नवा मार्ग शोधण्याच
धाडस दाखवायला हव
अडथळयांची वाट चालण शिकायला हव
आणि त्यातुन आपल्या आयुष्याच
गणित सोडवायला हवं.
आयुष्य खुप सुंदर आहे.
ते फक्त अनुभवून पहायला हवं.

**–कु. प्राजक्ता रामचंद्र शिंदे**
बी. ए. भाग ३

# युवापिढीची व्यसनाधीनता

भविष्य उज्वल भारताचे,
नेते नव्या पिढीचे
सैनिक आपल्या संरक्षणाचे,
शिक्षक उदयाच्या विदयार्थ्याचे
वडील उदयाच्या मुलांचे, आहेत कोण?

युवक आजच्या भारताचे
कुठे पडले अडकुनी?

वाट धरली पानपट्टीची
गुटखा,बीडी सुपारीची
आवडी त्यांना सर्वोपरी.

विचार न करता स्वतःचा
फक्त त्यांना व्यसन आवडी.

कॅन्सरचा झाला बोलबाला
आई–वडील, बहिण भाऊ काय सांगे कोणाला?

ऐका माझ्या बंधुनो भविष्य तुम्ही भारताचे,
भविष्य तुम्ही कुटुंबाचे.

म्हणूनच सांगते एकच सल्ला भला
आवरा स्वतःला, सोडा त्या वाईट व्यसनाला–

**– कु. मयुरी मधुकर पाटील**
बी. ए. भाग ३

## जीवन हे असेच असते?

जीवन हे असेच असते जीवन हे असेच असते
कधी हसर तर कधी रूसर तर कधी कष्टाळू
तर कधी आनंदी तर कधी प्रवासी
जीवनाचा अर्थ समजा तो तर अर्थ कधी समजत नाही
जीवन हे असेच असते जीवन हे असेच असते.

जीवनातील गोष्टीचा विचार करत, तर कधी नाही
जीवन हे संघर्ष करत असत
जीवनात खुप बदल होत असतात
पण मानुस हा मानुसच असतो
केवढा ही मानुस मोठा असु दे
शेवटी मानुस हा मातीताच प्राण सोडतो
जीवन हे असेच असते जीवन हे असेच असते.

नात्यातुन कळावे लागते शेतामध्ये राबावे लागते
काम मिळविण्यासाठी खुप हिंडावे लागते
उन्हा तानामध्ये राबावे लागते
जगण्यासाठी अन्न पाणी हे लागते
जीवन हे असेच असते जीवन हे असेच असते.

काही लोक असताता खुप धाडसी
जिथे लोक जात नाहीत तिथे जातात
जीवनामध्ये आनंद,राग,रूसण,हासणे
मनात या सर्व गोष्टी आपण ठेवतो
आपण मनाविरूध्द वागतो
जीवन हे असेच असते   जीवन हे असेच असते.

जो मनुष्य नेहमी दीर्घ उद्योगी असतो
त्याला आयुष्यामध्ये काहीच कमी पडत नाही
प्रश्न आपल्यालापडतो जीवन म्हणजे काय ?
या प्रश्नाचे उत्तर आपल्याला आपल्या जीवनात
मिळते.
जीवन हे असेच असते जीवन हे असेच असते.

जीवनात खूप हृदयाजवळची व्यक्ती असते
ती व्यक्ती आपणाला सोडून गेली की
आपले जीवन आधुरे राहत नाही
जीवनात कधी विजय होतो तर कधी पराभव होतो

जीवनात खुप काही चांगल्या गोष्टी कराव्यात अ
वाटते
जीवनात सुख मिळते कधी दुःख ही होते
जीवन हे असेच असते जीवन हे असेच असते
.

**– आनंदा भगवान कुंभा**
बी. ए. भाग



**– दिपाली फराकटे**
बी.एस्सी. ३

## "बाबा काठी टाकून द्या"

दात नव्हते तेंव्हा तुम्ही,
डाळभात भरवलात,
कौतुकान पाठीवरनं
नेहमीच हात फिरवंलात.
माझ्यासाठी बाबा तुम्ही,
खूप काही सोसलय
माझं लहानपण जपताना,
तुमचं तारूण्यही करपलय.
तुमच्या शब्दाबाहेर बाबा,
कधीही जाणार नाही
थकलात म्हणून तुमचा शब्द,
खाली पडू देणार नाही.
सुरकुतलेला तुमचा हात,
हातामध्ये घेईन,
तुमच्या डोळयात उदयाच्या,
जगण्याची आशा पाहीन.
आधाराची हातामधली
बाबा काठी टाकून दया.
मी आहे तुमचा आधार
तुमचा हात हाती द्या.

.

**–सौरभ ज्ञानदेव एरूडकर**
बी. एस्सी. भाग १

## लोक काय म्हणतील ?

चौकट मोडून बघेन म्हणतो
मनासारखे जगेन म्हणतो
परी नेमका येऊन छळतो
प्रश्न एक कातिल...पण
लोक काय म्हणतील ?

झेलित पाऊस चिंब भिजावे
सुचेल गाण तेथेच गावे
वाटे शिंगे मोडून व्हावे वासरास सामिल...
पण लोक काय म्हणतील ?

भिडभाड उसकावीन म्हणतो
जगास हिंमत दावीन म्हणतो.
फाडीन म्हणतो सर्व मुखवट
जिथे जसे दिसतील.....
पण लोक काय म्हणतील ?

**– विनायक मच्छिंद्र साबळे**
बी. एस्सी. भाग २

## मैत्री म्हणजे काय

एक ही मित्र नाही
असा माणुस कुठेच नाही
थोडया पुरती का होईना
प्रत्येकांने मैत्री केली असेल,
शरिरात रक्त नसेल तरी चालेल
पण आयुष्यात मैत्री हवीच
कितीही जुणी झाली तरी
ती ही वाटते नवीच,
रक्ताच्या नात्यात नसेल तेवढी
मैत्रीच्या नात्यात ओढ असते.
कशी ही असली तरी
शेवटी मैत्री ही गोड असते,
मैत्री म्हणजे त्याग आहे
मैत्री म्हणजे विश्वास आहे.
हवा फक्त नावापुरती
मैत्री खरा श्वास आहे,
मैत्रीच्या नात्याबद्दल
लिहिण्यासारखं खुप आहे.
खर नात नसल तरी
मैत्रीला एक रूप आहे,
मैत्रीला कधी गंध नसतो
मैत्रीला फक्त छंद असतो
मैत्री सर्वांनी करावी ! कारण !
त्यात खरा आनंद असतो.

– कु. सुरेखा मधुकर पाटील
बी. एस्सी. भाग १

## " साद देते मैत्रीला "

मी आणि माझी मैत्री
तिला लागली एक प्रकारची कात्री.

निघून गेल्या साऱ्याजणी
आठवण येते क्षणो-क्षणी.

डोळयांतून येऊलागले अश्रू,
मैत्री मात्र नका विसरू.

गेल्या कशा हया भुर्रकन उडूनी
येशील का गं परतूनी.

सगळयांच्या वाटा झाल्या वेगवेगळया
पुन्हा भेटतील ना सगळया.... ?

– कु. अंकिता अनिल देवर्डेकर
बी. ए. भाग २

## खरं प्रेम.....

एक चिमणी गूलाबावर
खूप प्रेम करायची
एके दिवशी तिने आपले
प्रेम व्यक्त ही केलं,
पण गुलाब म्हणाला
जेव्हा माझा रंग लाल होईल
तेव्हाच मी प्रेम करेन
चिमणीने आपले पंख कापले
आणि गुलाबावर रक्त सांडले,
गुलाब लाल झाला पण,
गुलाबावर प्रेम करणारी
चिमणी मात्र नव्हती......

**– विकास तुकाराम कांबळे**
बी. ए. भाग २



**– वारके सरिता**
बी.एस्सी. २

## शेवटी मी एकटाच...

तुला हसवणारे बरेच असतील पण,
तुझ्यासाठी तुझ्यावर चिडणारा
मी एकटाच असेन.....

लगबगीत चालताना तुझ्या स्पर्शाची वाट
पाहणारे बरेच असतील पण,
'जपून चाल' सांगणारा कदाचित
मी एकटाच असेन....

हसत–हसवत तुला टाळी देणारे बरेच असतील
पण,
तु रडताना तुझा हात हातात घेऊन
तुला धीर देणारा कदाचीत
मी एकटाच असेन.....
तुला कळावे म्हणून तुझी काळजी घेणारे
बरेच असतील पण,
तुझ्या नकळत तुझी काळजी घेणारा
मी एकटाच असेन.

**– अजय तुकाराम खोराटे**
बी. ए. भाग १

# माझी मायबोली

इंग्रजीच्या नादापाई
मराठीचा डब्बा गोल ।
मराठी माणसा
आता तरी मराठीत बोल ।।
इंग्रजीच्या पेपरात होतो
वर्ग सारा पास ।
पण मराठीचा पोरगा होतो
मराठीत नापास ।।
प्रेम करतो म्हटलं की
पोरगी समजते शेंबडया ।
अन् आय लव यू म्हटल्यावर
मनात मारते उडया ।।
माय झाली मॉम आणि
बाप झाला डॅड ।
रेव्ह पार्टीत नाचून
पोर झाली मॅड ।।
भांडण करते बायको
धरते एकच हेका ।
कायबी झालं तरी चालंल
पोरगं इंग्लीश शाळंत टाका ।।
मराठी माणसापासूनच आहे
खरा मराठीला धोका ।।
शाळेत मिळत नाही
मराठीचा शिक्षक ।
मराठी माणूसच आहे
मराठीचा भक्षक ।।
तुकोबाची अभंगवाणी
आन् मराठीचा गोडवा ।
मराठी माणसाचे नववर्ष
असतो गुढीपाडवा ।।
सावध व्हा मित्रांनो
जपा मायबोली ।
भाषा रक्षणासाठी
बोला मायबोली ।।

– सचिन तानाजी सुतार
बी. ए. भाग ३





– कांबळे माया
बी.एस्सी. ३

# ॥ भावपूर्ण श्रद्धांजली॥

अशी पाखरे येती...
आणिक
स्मृती ठेऊनी जाती.....



ख्रिस्तवासी डॉ. संजय गायकवाड



कैलासवासी रामचंद्र आळवेकर

# श्री दूधसाखर महाविद्यालय, बिद्री (मौनीनगर) वार्षिक गुणगौरव समारंभ



दादा कोंडकेंचे वारसदार नितीन कुलकर्णी प्रमुख मार्गदर्शक



भागातील क्रीडाशिक्षक प्रा. शेडगे यांना संघटक म्हणून शिवछत्रपती पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार



वार्षिक क्रीडा स्पर्धेचा पुरस्कार स्विकारताना बी.एस्सी. च्या विद्यार्थीनी



खाद्य महोत्सवाचा आस्वाद घेत असताना मा. प्राचार्यांसमवेत प्राध्यापकवर्ग




शेला-पागोटेचे उद्घाटन करताना मा. प्राचार्य



संगीत शेला-पागोटेचा स्विकारताना वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख व विद्यार्थी



सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये भारूड सादर करताना युवा महोत्सवचे कलाकार



सांस्कृतिक कार्यक्रमातील ग्रुप डान्स

# ।। भावपूर्ण श्रद्धांजली ।।

अशी पाखरे येती...
आणिक
स्मृती ठेऊनी जाती.....



ख्रिस्तवासी डॉ. संजय गायकवाड



कैलासवासी रामचंद्र आळवेकर

# श्री दूधसाखर महाविद्यालय, बिद्री (मौनीनगर) वार्षिक गुणगौरव समारंभ



दादा कोंडकेचे वारसदार नितीन कुलकर्णी प्रमुख मार्गदर्शक



भागातील क्रीडाशिक्षक प्रा. शेडगे यांना संघटक म्हणून शिवछत्रपती पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्क



वार्षिक क्रीडा स्पर्धेचा पुरस्कार स्विकारताना बी.एस्सी. च्या विद्यार्थीनी



खाद्य महोत्सवाचा आस्वाद घेत असताना मा. प्राचार्यांसमवेत प्राध्यापकवर्ग




शेला–पागोटेचे उद्घाटन करताना मा. प्राचार्य



संगीत शेला–पागोटेचा स्विकारताना वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख व विद्यार्थी



सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये भारूड सादर करताना युवा महोत्सवचे कलाकार



सांस्कृतिक कार्यक्रमातील ग्रुप डान्स



"मानव का कर्तव्य यही है, वह सदवृत्ति न छोडे।
तोडे नही स्नेह का बंधन, जोड सके तो जोडे।।"

'कोणार्क'

– रामेश्वर दयाल दुबे

# हिंदी विभाग

प्रा. डॉ. देसाई सादिक

# अनुक्रमणिका

## ■ गद्य विभाग ■


| | | | |
|---|---|---|---|
| १. | समय का प्याला | – मोरेश्वर दत्तात्रय अस्वले | बी. ए. ३ |
| २. | मेरी यात्रा का अनुभव | – कु. वर्षा प्रकाश पाटील | बी. ए. ३ |
| ३. | मेरा बचपन | – कु. पूजा अजित पाटील | बी. ए. १ |
| ४. | बिखरे पत्ते | – कु. कोमल कृष्णात खाडे | बी. ए. ३ |
| ५. | कन्याभ्रुण हत्या | – कु. तेजस्विनी मारूती कोनगुळकर | बी. ए. ३ |


## ■ पद्य विभाग ■


| | | | |
|---|---|---|---|
| ६. | तेरी बेटी | – कु. वर्षा कांबळे | बी. एस्सी. २ |
| ७. | कोई दिखाता कहता है | – रविंद्र बाळासाहेब डाफळे | बी. एस्सी. २ |
| ९. | कॉलेज | – कु. कविता पाटील | बी. ए. ३ |
| १०. | महाभारत | – कु. प्रियंका तानाजी मगदूम | बी. एस्सी. १ |
| ११. | हिंदी विभाग | – अनिल दत्तात्रय पाटील | बी. ए. २ |

# समय का प्याला

मंदिर के बाहर लिखा हुआ एक खुबसुरत सच, 'अगर उपवास करके भगवान खुश होते तो इस दुनिया में बहुत दिनों तक खाली पेट रहनेवाला भिखारी सबसे सुखी होता।' उपवास अन्न का नही। विचारों का करें। इंसान खुद की नजर में सही होना चाहिए, दुनिया तो भगवान सें भी दुःखी है। चिडिया जब मर जाती है, तो तब चिटिंया उसको खा जाती है। इसलिए कभी किसी को कम मत आँको। तुम शक्तीशाली हो सकते हो, समय तुमसे भी शक्तिशाली है। एक पेड से लाखो माचिस की तिलिया बन जाती है पर एक माचिस की तिली से लाखो पेड भी जल सकते है। कोई चाहे कितना भी महान क्यों ना हो जाए, पर कुदरत भी कभी किसी को महान बनने का मौका नही देती। कंठ दिया कोयल को, तो रुप छीन लिया। रुप दिया मोर को तो ईच्छा छीन ली। मत करना कभी भी गुरूर अपने आप प ऐ इंसान भगवान ने तेरे और मेरे जैसे कितनो कों मिटी से बनाकर मिठी में मिला दिया। इंसान दुनिया में तीन चीजों के लिए मेहनत करता है।

१) मेरा नाम ऊँचा हो।

२) मेरा लिबास अच्छा हो।

३) मेरा मकान खुबसुरत हो।

लेकिन इंसान के मरते ही भगवान उसकी तीनों चीजे सबसे पहले बदल देता है। १) नाम (स्वर्गीय) २) लिबास (कफन), ३) मकान (शमशान)

जीवन की कडवी सचाई जिसे हम समझना नहीं चाहते। एक पत्थर सिर्फ एक बार मंदिर जाता है और भगवान बन जाता है, इंसान हर रोज मंदिर जाते है फिर भी पत्थर रहते है। जीवन में हर जगह हम 'जीत' चाहते है, सिर्फ फुलवाले की दुकान ऐसी है जहा हम कहते है, 'हार' चाहिए। क्योंकी हम 'भगवान' से जीत नही सकते....।

**– कु. मोरेश्वर दत्तात्रय अस्वले**

बी. ए. ३

****



–सुर्यवंशी अनिता

बी. ए. ३

# मेरी यात्रा का अनुभव

मैंने बी.ए. ३ में हिंदी विषय के लिये प्रवेश लिया, और देखते - देखते पाँचवी सेमिस्टर कब खत्म हो गई समझमें ही नहीं आया। उसके बाद कॉलेज शुरू हुआ, लेक्चर हररोज होते थे, ठंड भी बहुत थी, तब सबके मन में आया कि हमे हमारे विभाग की एक यात्रा निकालनी चाहिए । इस हमारे सोच को डॉ. देसाई सर और डॉ. दिघे सर ने भी पूरी सहमती दी। हमने भी पूरी सहमती परिवारवालों से ली और १६ जनवरी यह दिन हमने यात्रा के लिए निश्चित किया। हमारे सर ने भी मा. प्रा. राजगोळकर सर जीके सहमती से यात्रा का आयोजन किया हमारे हिंदी विभाग की आठ लडकियाँ और दो सर हम सब १६ जनवरी २०१६ को सिंधुदूर्ग किला तारकर्ली और कुनकेश्वर मंदिर इन पर्यटनस्थलों को भेट देने का निश्चिय किया। इस एकदिन के यात्रा मे हमने प्राप्त किए अनुभव बहुत अच्छे और अलग थे । कॉलेज से थोडा समय निकालकर,अध्ययन से पिछा छोडकर हमने एकदिन यात्रा को दिया ।

१६ जनवरी को सुबह ८.०० बजे हम बिद्री से निकले । ठंड बहुत थी, सब जॅकेट वैगेरा पहने हुए थे । थोडे देर में कुछ मिल दूर जाने के बाद हमने गाडी रोक दी और हमने खाना खाया । सब अपना अपना खाना लाए थे । खाने में किसी की आलु की सब्जी थी, किसी की उसल, तो किसी की दाल थी इन सब की मजा हमने ली। खाना खाने के बाद फिर यात्रा शुरू हुई । हमको सबसे पहले सिंधुदूर्ग किले को देखना था, सिंधुदूर्ग किले की तरफ हमारी यात्रा शुरू थी। जब हम घाटी में गए तब तो हमें आया हुआ अनुभव विलक्षण था, सबके मोबाईल सोये हुए स्थिती में थे । लगभग १० मिल के फोंडा घाटी से जाते वक्त हमें बहुत आनंद हो रहा था। घाट के पेड, बडे-बडे पत्थर, गहरी खाई यह सब अच्छा नजारा था। यात्रा करते वक्त हम रास्ते के किनारे वाले बोर्ड पढ रहे थे । एक बोर्ड बहुत अच्छा था, उससे उन्होने बहुत अच्छा संदेश दिया जैसे-

स्टेअरींग + मोबाईल = ॲक्सिडंट

गाडी चलाते वक्त मोबाईल का इस्तेमाल करना गलत है, ऐसा उन्होने संदेश देने की कोशीश की थी । उसके बाद एक मजेशीर बोर्ड था वह ऐसा कि,

'हम है राही घाटी के
फिर मिलेंगे चलत-चलते'

इस तरह के बोर्ड हम पढ रहे थे, और जो अच्छे संदेश देनेवाले बोर्ड थे उनसे हम सिख भी ले रहे थे ।

दोपहर को १२.०० बजे हम सिंधुदूग में पहुँचे तो निले सागर को देखते ही रह गये । असंख्य नौकाए दिख रही थी । किनारे से सिंधुदूर्ग किला दिखाई दे रहा था । जब हमने किले को देखा तो छत्रपति शिवाजी महाराज की याद आयी

ऐतिहासिक स्थलों को देखते ही मन में इतिहास जाग जाता है और गर्दन अभिमान से खडी हो जाती है, महाराष्ट्र के पावन भुमि पर जन्म लेने का सार्थक हो गया ऐसा लगता है । किनारे पे सागर की लहरे जोर से थी, फिर भी सागर में जाने की आस निर्माण हो चूकी थी । नौकाए पर्यटकोंको किले पर पहुँचा रही थी, और उनको वापस भी लेकर आ रही थी । हमने भी नौका के पासेस निकाले गए और हम सब नौका में बैठे। बोट शुरू हो गयी, तब हमे केशरी रंग का सुरक्षा जॅकेट पहनने को दिया । सभी चौकींत हुए किसी ने पहना, किसी ने नहीं । बाद में हमने भी पहना । जब हमने सुरक्षत्त जॅकेट पहना तब हम अलग दिख रहे थे, हम सब एक-दूसरे पर हस रहे थे। नौका में से हाथ बाहर निकालकर सागर के पानी का मजा ले रहे थे । किला नजदीक आ रहा था । उसी क्षण मुझे यह दिखने को मिला कि, बडे शहर से आए हुए सुशिक्षित लडके-लडकियां हमारे नौका में थे। उनको देखते ही पता चल रहा था की, पाश्चात संस्कृति उनमें रूढ हो गई है । हमारी नौका में विडिओ शुटींग, फोटो निकालना आदि शुरू था। वहाँ हर एक बोट का अपना-अपना नाम था और वह उसी नाम से पहचानी जाती थी। थीं । हम जिस बोट में बैठे थे उस बोट का नाम 'कविता' था, जो हमे किले पर पहुँचा रही थी और बाद में वापस भी लेकर आनेवाली थी । हम नौका से उतरे । १ घंटा नौका रूकनेवाली थी, १.३० ते २.३० इस समय में हमे किला देखना था ।

सिंधुदूर्ग किले का हम निरिक्षण कर रहे थे। तब हमे एक बोर्ड देखा वह ऐसा कि, अँग्रेजी 'वाय' आकार का नारियल का पेड बिजीली गिरने की वजह से अब वह नहीं रहा । वह पेड हमे देखने को नही मिला इस वजह से हम दूःखी हुए ऐसा दुहरे तने का पेड सिर्फ सिंधुदुर्ग किले पर था। वहाँ ओर भी पर्यटक आए हुए थे । किले की बडी-बडी चट्टाने निचे का सागर पूराने कुएँ ऐसा वह विलक्षण किलाथा। सागर में नौकाए को देखते ही ऐसा लग रहा था कि मानों आकाश के तारे सागर में उतरे है । और एक महत्वपूर्ण और आश्चर्य की बात यह थी कि महाराष्ट्र के पहले छत्रपति शिवाजी महाराज का मंदिर वहाँ था । हमे महाराष्ट्र में कहीं भी छत्रपति शिवाजी महाराज के पुतला दिखाई देंगे परंतू वहाँ एकमात्र उनका मंदिर था, जहाँ उनकी हररोज पूजा की जाती थी । यह सूनते ही हम भी बहुत खुश हुए । अब हमारा चलने का समय हो चुका था । २.३० बजनेवाले थे, हम वहाँ से हमारे 'कविता' नौका के पास आए, और हम नौका में बैठे उसने हमे किनारे तक पहुँचाया ।

वहाँ से हमारी मालवन से ६ ते ७ मिल दूरी पर की तारकर्ली बिच की तरफ यात्रा शुरू हुई । हम ३.३० बजे तारकर्ली बिच में पहुँचे वहाँ किनारे पे धडकनेवाली सागर की लहरे दिख रही थी, वह लहरे देखते ही हम सागर में जाने के लिए तैयार हो गए । हम सागर में गए और उन लहरों के साथ बहुत खेले । बिच-बिच में डॉल्फिन दिखाई दे रही थी। हमने किनारे पर फैले हुए शंखो को इकठ्ठा किया।

किनारे पे मरी हुई स्टार मछलियाँ दिखाई दी जिससे मन दुखी हुआ। लहरोंके साथ आले वाले छोटे-छोटे केकडों को देख मन में भय उत्पन्न हुआ।

भय और दुख को नष्ट करने का काम सागर की लहरों ने किया। दूर-दूर तक केवल पानी ही पानी नजर आ रहा था। इतना अच्छा नजारा हमे देखने को मिला था, हम भुल गये कि हमें कुनकेश्वर में भी पहुँचना है । इसलिए हम वहाँ से निकले तब ५.०० बज गये थे ।

तारकर्ली से हम कुनकेश्वर में पहुँचे वहॉ भी सागर था । वहाँ का सागर बहुत गहरा है, और वहाँ लहरे भी बहुत जोर से धडकती है ऐसा हमने हमारे सर से सुना । किनारे से चलते -चलते हम मंदिर तक पहुॅचे वहॉ महादेवजी का बहुत बडा और सुंदर मंदिर था, मंदिर में भी बहुत स्वच्छता थी । हमने दर्शन लिया । वहाँ सें हमने सनसेट देखा । उसे देखते ही ऐसा लग रहा था कि, सूर्य समंदर में ही गिर रहा है । वहाँ भी पाठशाला के छोटे बच्चे,और भी पर्यटक उपस्थित थे, हमारी तरह उनकाभी फोटो निकालना, विडिओ शुटींग वैगरा शुरू था । हमने वहाँ प्रसाद लिया और हम वहाँ से चले ।

अब हमे लौटना था, अर्थात अपने-अपने गाँव पहुँचना था, इस सोच से सभी परेशान हो गए, घर जाने का किसी का भी मन नहीं था । दिनभर में किया हुआ मजा, हमारे सर ने भी माँ-बाप की तरह लिया हुआ हमारा ख्याल, सागर के लहरों के साथ मस्ती, मनतृप्त करनेवाले ऐतिहासिक स्थान इसी वजह से हम घर जाना नही चाहते थे। इस तरह एकदिन के यात्रा में आए हुए अनुभव बहुत अच्छे थे। यात्रा में हमारे साथ जो हमारे सर थे उन्होने हमारे माँ बाप की तरह हमारी देखभाल की उनकी वजह से ही एक दिन की यात्राा सफल हुई । हमारे सर के बारे में भी कुछ कहना हो तो वह भीं कम पड जायेगा। कुनकेश्वर से हम निकले और रात के ९.०० बजे हमने रास्ते के होटल में खाना खाया । खाना खाने के बाद हम फिर चले । अब हमें अपने अपने घर जाना था रात के १२ बजे हम सुरक्षित घर पहूँच गये। हम सबको अपने अपने घरतक पहूँचा कर हमारे सर अपने घर कोल्हापूर चले गये। ऑखो पर विश्वास नहीं होगा ऐसा दिखनेवाला सिंधुदूर्ग किला, जहाँपर आकाश ही निचे उतरा है ऐसा लगनेवाला सिंधुदूर्ग का सागर और नौकाऐं, तारकर्ली के सागर की लहरों के साथ किया हुआ मजा और कुनकेश्वर का इतना सुंदर और बडा मंदिर ये सब एक दिन के यात्रा में जो हमने अनुभव किया वह विलक्षण और सुंदर था । उससे हमें बहुत कुछ सिखने को मिला ।

इस तरह 'हिंदी विभाग' की एक दिन की यात्रा बहुत अच्छी थी, वह यात्रा हमें बहुत कुछ सिखा गई, अध्ययन से पिछा छुडाकर किया हुआ मजा, मेरे कॉलेज जीवन की पहली यात्रा थी जो हमेशा याद रहेगी।

**- कु. वर्षा प्रकाश पाटील**

बी. ए. ३




-गुरव सनी
पी. एस्सी. २

# मेरा बचपन

''लहानपण देगा देवा,
मुंगी साखरेचा ठेवा ।।''

मराठी का यह दोहा रेडियोपर बज रहा था दोहे सुनते सुनते मैं अपने बचपन में ऐसे खोई कि, मुझे पता ही नहीं चला । बचपन के वे दिन मेरे मन को छू रहे थे । अभी वो हमेशा के लिए मेरे जीवन से बिदा हो गये थे ।

सचमुच, बचपन कितना आनंददायी और रम्य होता है । बचपन में किसी चीज की जिम्मेदारी नहीं रहती । सभी पास पडोस के लोग, सगे-संबंधी, आनेवाले मेहमान,घर के सदस्य बच्चों को बहुत प्यार करते हैं ।

मेरा बचपन अन्य बच्चों की तरह ही बहुत सुखमय था । बचपन में माँ की गोद में सोना, माँ के हाथ से खाना खाना, दिनभर इधर-उधर घूमना इतना ही काम हर बच्चे की तरह मुझे भी होता था । सब लोग कहते है की बचपन मे मैं बहुत ही नटखट ओर शोर-शराफा करने वाली बच्ची थी ।

बचपन में जब माँ स्कूल जाने के लिए मीठी मीठी बाते करते हुए नींद से जगाने की कोशिश करती थी, तब उसी बातों के कारण मैं फिर सोने का नाटक करती थी । फिर माँ नाश्ता खिलाकर स्कूल भेजती । मुझे स्कूल की सभी टीचर मुझे मेरे माँ की तरह ही लगती थी । स्कूल में भी पढाई करना, माँ ने दिया हुआ डिब्बा खाना, सब के साथ मिल-जुलकर गाने गाना,खेलना, कुदना ये सब घर जैसा ही होता था ऐसी ही मौज-मस्ती करते करते मेरे बचपन का समय बीत गया । जिसका पता ही नही चला ।

स्कुल से आते ही घर में शोर मचाना शुरू हो जाता था । घर आते समय पिताजी चॉकलेट, आईस्क्रीम की खैरात बरसाते थे। रात का खाना खिलाते समय ही निदीयारानी ऑखो पे छा जाती थी।

ऐसे ही ये मेरे बचपन के सरल ओर सीधे दिन । ना कोई चिंता, ना कोई गम । पर बचपन में लगता था, कि कब हम बडे हो जाए । भैया जैसे अकेले अपने मित्रों के साथ घूमना-फिरना अपनी मनपसंद चीजे खाना,ऐसा मन करता था ।

लेकिन.... अब जब बडे हो गये है, और हमारे बचपन के दिन गये है,तब फिर बचपन को सुनहरे दिनों की यादें आती हैं ।

मेरे शरीर पर चोट की वजह से आये हुए निशान मेरे बचपन की बुरी यादों का सबुत है, उसी तरह आज भी मेरे बचपन की कुछ अच्छी यादे मेरे साथ है । जिस बात की मुझे खुशी है । बचपन में मुझे कुत्तों के छोटे पिले से बहुत लगाव था । और उसी लगाव के कारण स्कूल से एक छोटा पिला लाई थी। जब मैने उसे घर में लाया, तब वह सिर्फ पाँच दिन का था । और इसी पिले के कारण मैंने माँ से बहुत डाँट भी खाई थीं । माँ के बहुत हिचखिचाहट के बाद

भी मेरे शौक के कारण उसे हमारे घर में रखा गया । आज वह १२-१३ साल का हो गया है । शुरूवात में जो माँ उसे सँभालना नही चाहती थी। वही अब उसका सबसे ज्यादा ख्याल रखती है । मेरे बचपन के कौतुक प्रियता के वजह से वह हमारे घर में आया था । आज वह घरका सदस्य बन गया है ।

इन्सान के पास जो चीज नही होती है, उसीपर उसका दिल हावी हो जाता है । इसी बात को हर अमीर ओर गरीब बराबरी से चहता है । चाचा नेहरू, महात्मा गांधी, जैसे बडे प्रतिष्ठीत ओर सन्माननिय शक्सीयतों को भी कुछ पल के लिये ही सही पर ये बचपन लौट आये ऐसा लगता था ।

बचपन में हर एक बच्चा अपने माँ-बाप के सर पर हुए छत्र रूपी हाथों के शीतल छाया में रहता है । उनको दुःख की भनक भी नहीं होती । लोग कहते है , हर किसी का बचपन नटखट, प्रेम, वात्सल्य की मूरत हाता है । लेकिन हर एक के बचपन की सबसे अलग पहचान होती है । मेरा बचपन भी इक नई पहचान लिए मेरे यादों में हमेशा रहेगा ।

यादें !

बचपन की यादें आते ही
ओठों पर गाने की लकीरे आती है ।
''बचपन के वो दिन ।
उडते-फिरते तितलियाँ बनके ।''

धन्यवाद !

– पाटील पुजा अजित
बी. ए. भाग १



– माने विजय
बी. एस्सी. २

# बिखरे पत्ते

पल्लवी चेअर पर बैठकर कुछ सोच रही है। बहुत परेशान दिखायी दे रही है वह। चेहरा कुम्हला गया है। चेहरे की ताजगी न जाने कहाँ गुम हो गयी है? उसे आज अपने कियें पर पछताना हो रहा था शायद। उसके हाथ में एक सुंदर नौजवान की तस्वीर है। तस्वीर को देखते - देखते पल्लवी बीती यादों में खो जाती है। यादों की एक शृंखला उसकी आँखो के सामने से गुजरने लगती है।

सुरेश उसका एक दोस्त गोरा रंग, लंबा कद, गोल चेहरा तथा उसका व्यक्तित्व का प्रभाव अनेक युवतियों पर था। एक दिन सुरेश पल्लवी को लेकर मुंबई के एक अलिशान होटल में डिनर के लिये गया। खाना खाते समय सुरेश ने पल्लवी को शादी का प्रस्ताव रखा। पल्लवी आश्चर्यचकित होकर उसकी ओर देखती रह गयी। सुरेश के नीली आँखो की चमक को देखकर वह खुश हो गयी। परंतु उसने तुरंत शादी के लिये कबुली नहीं दी। 'सोचकर बताऊंगी' यही उसने कहा। इसके बाद तो सुरेश ने जैसे पल्लवी पर जादू ही कर लिया। सुरेश की हर बात पल्लवी को अच्छी लगने लगी। वह दिलो जान से सुरेश को चाहने लगी। सुरेश कम्प्युटर इंजिनीअर था। सुरेश के साथ घुमना, उसे ऑफिस में जाकर मिलना पल्लवी का नित्यक्रम बन गया। धीरे धीरे सुरेश ने पल्लवी का भरोसा जीता और एक दिन वह उसे आने घर ले गया। उस दिन....

दोनों जब सुरेश के घर पहुँचे तो घर पर कोई नहीं था। सुरेश से पता चला कि, उसके माँ-बाबुजी तथा भाई बहन कन्याकुमारी चले गये है। पल्लवी का संकोच थोडा कम हुआ। वह खुलकर बाते करने लगी। सुरेश ने अवसर का फायदा उठाया। पल्लवी भी थोडी थोडी बहक गयी थी। उसका पैर फिसल गया। उस वक्त पल्लवी को उन्होंने जो किया उसमें कोई बुराई नजरी नहीं आयी। कुछ दिनों बाद सुरेश किसी काम के सिलसिलें में दिल्ली चला गया। उसे छः महिने तक दिल्ली में रहना पडेगा यह बात उसने पल्लवी को बतायी थी। साथ ही वापस लौटने पर शादी करने की बात कहकर पल्लवी को खुश किया था।

दिन सरकते गये। पल्लवी एक दिन अपनी एक सहेली के घर गयी थी। उसका जी एकदम मचलने लगा, उलटीसी होनी लगी। घबराकर पल्लवी डॉक्टर के पास पहुँची थी पता चला कि, पल्लवी सुरेश के बच्चे की माँ बननेवाली है। सुरेश जब मुंबई लौटा, तो पल्लवी खुशी से पागल हो गयी। उसने माँ बनने की बात सुरेश को बतायी सुरेश ने कानपर हाथ रखते हुअे इस बच्चे का बाप होने से इन्कार कर दिया। दोंनो मे काफी बहस हुअी। सुरेश पल्लवी को बहुत बुरा-भला कहते हुअे किसी का पाप सिर थोपने की अतिशय जलील बात कहकर वहाँ से चला गया। कुछ दिनों बाद उसने शादी की और दिल्ली में सेटल हो गया।

इधर पल्लवी के गर्भवती होने की बात उसके

घरवालों तक पहुँची, तो उन्होंने स्वर्ग पाताल एक कर दिया । गर्भपात करने की सलाह उसे दी गयी । पर अब पूरे सात महिने हो चुके थे । इसलिये डॉक्टर ने गर्भपात करने से मना कर दिया । पल्लवी को घर से बाहर निकाल दिया गया । सारे रास्ते बंद हो गये । मजबूर होकर पल्लवी को एक महिलाश्रम का सहारा लेना पडा । महिलाश्रम की संचालिका जयादेवी एक वृध्दा थी । पल्लवी उसे अच्छी लगने लगी थी । कुछ दिनों बाद पल्लवी ने एक नन्हेसे बालक को जन्म दिया अब तो जयादेवी ने पल्लवी का पुरा सहारा देते हुअे, अपना कर्तव्य निभाया । पल्लवी अपने बच्चेसहित आश्रम में दिन बिताने लगी ।

एक दिन एक युवक आश्रम में आया । वह जयादेवी का लडका था और मुंबई में एक कन्स्ट्रक्शन कंपनी का मालिक था । दिखने मे सुंदर था । वह अपनी माँ से मिलने कभी-कभी सालों बाद आता था । जब उसने पल्लवी को देखा, तो वह दिल ही दिल में उसे चाहने लगा । अपने दिल की बात उसने माँ से कही । जयादेवी को पल्लवी अच्छी लगती थी। परंतू उसका भूतकाल भी उन्हे मालूम था । शायद यह बात विक्रम को अच्छी नहीं लगेगी । ऐसा सोचकर जयादेवी ने पल्लवी का अतित विक्रम के सामने रखा । पर उसके बावजूद भी विक्रम ने पल्लवी को स्विकार करने का अपना इरादा कायम रखा ।

विक्रम और पल्लवी की शादी बडी धूम-धाम से हुअी दोनों मुंबई में विक्रम के घर मे रहने लगे। पहले पहल पल्लवी विक्रम के एहसास की वजह से दब कर रहती थी । पर धीरे-धीरे उसके व्यक्तित्व में स्थित पत्नीत्व जागने लगा। विक्रम का देर सें घर लौटना, दूसरी औरतों के साथ बोलना, मिलना, जूलना उसे अच्छा नहीं लगता था । एक पार्टी में जब दोनों एक साथ गये थे, तो वहाँ विक्रम की नजदीकी दोस्त दीपाली से मुलाकात हो गयी। दीपाली एक डॉक्टर थी । विक्रम और दीपाली ने खूब बातें की, साथ में डान्स भी किया । घर लौटे पर इस बात को लेकर पल्लवी ने खूब शोर मचाया। धीरे धीरे इन्ही बातों को लेकर दोनों में तनाव पैदा होने लगा ।

विक्रम ने अपनी तनावपूर्ण पारिवारिक बातें दीपाली को बतायी थी । दोनों पहले सें एक दूसरे के अच्छे दोस्त थे । अब सुख-दुःख के साथी बन गये । देखते -देखते दीपाली को विक्रम से प्यार हो गया । विक्रम भी पल्लवी से तंग आ गया था । उसने पल्लवी से डायव्होर्स लेकर दीपाली से शादी की।

पल्लवी सोचते-सोचते बेहोश हो गयी । उसे पागल पन का दौरा पडा और बाद मे .....

एक चेयर पर पल्लवी बैठी है । एक कंपौडर उसे अस्पताल में ले जा रहा है । अस्पताल का नाम है ।

'दिपाली मेंटल हॉस्पिटल'

- कु. कोमल कृष्णात खाडे
हिंदी विभाग

****

# कन्या भ्रुण हत्या

देश मे पुरूषौ के मुकाबले स्त्रियोकी कम होती संख्या चिंताजनक विषय है । यह चिंता होनी भी चाहिए क्यों की जब हम मानव समाज की बात करते है, तो वह दोनो पर समान रूपसे आधारित है । रिश्तोंके नाम कुछ भी हो मगर स्त्रि से ही देश को आधार मिलता है । इस समय स्त्रियोंकी कमी का कारण कन्या भ्रुण हत्या माना जा रहा है । इसमे उसके जनक माता-पिता,दादा,दादी नाना-नानी की सहमती शामिल होती है । यह संभव नही है की, कन्या भ्रुण हत्या मे किसी नारी की सहमती न शामिल हो । संभव है कि नारीवादी कुछ लेखक इसपर आपत्ति करे यह सत्य नही बदल सकता क्योंकि हम अपने समाज कुरितियो अंधविश्वासो और पाखंडोको अनदेखा नही कर सकते जिसमे स्त्रि और पुरूष समान रूप से शामिल होते दिखते है ।

अनेक समाजसेवको, संतो तथा बुद्धिजिवी निरंतन कन्या भ्रुण हत्या के विरूद्ध अभियान छेडे हुए है । उनकी गति विधियोकी प्रशंसा करनी चाहिए। मगर हमे यह बात देखनी चाहिए कि कन्या भ्रुण हत्या समस्या नही बल्कि समाज मे व्याप्त दहेज तथा अन्य प्रकार की सामाजिक सोच का परिणाम है कन्या भ्रुण हत्या रोको जैसे नारे लगाने से यह काम रूकनेवाला नही भलेही कितनीही राष्ट्रभक्ति या भगवान भक्ति की कसमे खिलाते ।

हमारे यहाँ अनेक प्रकार के समाज है। हर समाज मे नारी की स्थिती एक जैसी है । उसपर उसका पिता होना मतलब अपना सिर कहीं झुकानाही है। अनेक लोग कहते भी है कि लडकी के बापको सिर तो झुकानाही पडता है ।

कुछ समाजने तो अब शराबखोरी और मांसाहार परोसने जैसे काम विवाहो के अवसर सार्वजनिक कर दिए है, जो कभी हमारी परंपरा का हिस्सा नही रहे। वहाँ हमे हमारा धर्म, संस्कार, संस्कृति याद आती है और उसका ढिंढोरा पिटनेसे बाज नहीं आते । कहने का अभिप्राय है किं, कन्या भ्रुण हत्या का नारा लागना है तो नारा लगाइए पर देश के लोगोको प्रेरित करिए की :-

१) शादी समारोह अत्यंत सादगीसे कम लोगोकी उपस्थिती मे करे भलेही बादमे स्वागत कार्यक्रम स्वयं लडकेवाले करे ।

२) दहेज को धर्म विरोधी घोषित करे । याद है हमारे यहॉ दहेज उल्लेख केवल भगवान श्रीराम के विवाह मे दिया गया था पर उस समय की हालत कुछ अलग थी, समय के साथ चलना ही हमारे अध्यात्मिक दर्शन का मुख्य संदेश है ।

३) लोगोंको यह समझाए कि अपने बच्चे का उपयोग अस्त्र, शस्त्र की तरह न करे जिससे चलाकर अपनी वीरता का परिचय दिया जाता है ।

४) अनेक रस्मोको रोकने की सलाह दे ।

सबसे ज्यादा हैरानी की बात यह है कि जब

लडकियों की संख्या इतनी कम हो रही है तबभी लडकवाले दहेज बाजार मे भाव क्यो नही गिरे? लाखों रूपयोंका दहेज,गाडी तथा अन्य समान निरंतन दहेज मे दिया जा रहा है । इतनाही नही लडकियोंके सामाजिक सम्मान मे भी कोई बढोतरी नही हो रही है। इन सभी बातो का अस्त किए बिना कन्या भ्रुण हत्या रोकने का प्रारंभ वैचारिक अभियान सफल हो जाएगा इसमे संदेह है ।

**– कु. तेजस्विनी मारूती कोनगुळकर**

हिंदी विभाग, बी.ए ३

****



**–ढेंगे अर्चना**

बी. एस्सी. ३

## वो......

क्लास में हरवक्त सामने रहती थी
चांद से भी ज्यादा वह खुबसुरत थी
फुलों से भी अच्छी उसकी मुस्कान थी
शायद वह कोई इन्सान नही कोई परी थी ।।

जब–जब में उसकी तरफ देखता था
वह मेरी तरफ देखकर हसती थी
तब सिर्फ लडके ही क्यों
लडकियों भी मझसे जलती थी ।।

मेरे दिल में नई–नई उमंग थी
फिर इतने छोटे उम्र में
मैने पाई हुई बहुत बडी मंजील थी
कोई उसको हाथ लगाने की कोशीश भी करे तो
मुझे गुस्सा आता था ।।

सभी का दिल चुराने वाली कौन थी
माफ करना दोस्तो वह कॉलेज में दिवार पर
लटकती हुई
मेरे हाथों मे सजी हुई
खुबसुरत लडकी की
पेटिंग थी ।।

–पाटील अनिल दत्तात्रय

बी. ए. २

## तेरी बेटी

मासूम दिल, सूरत भोली
मैं हूँ तेरे मुख की लाली ।
ना तुने मुझे देखकर पहचाना ।
ना मैने तुझे पहचानकर देखा ।
मगर माँ महसूस किया जरूर
क्यूँ माँ तु इतनी है मजबूर ?
अपनी ही हांथोसे मेरा गला घोट रही है ?
क्यूँ इस दुनियामें आने से रोक रही है ?
क्यूँ माँ इतनी मुझसे रूठी ?
अब तुझे मेरी पुकार भी लगे झुठी ।
मुझे मौत से लगता है डर ।
माँ मुझ पर एक एहसान कर ।
जीने की लगी है मुझे प्यास ।
जीवन दान दें मुझे यही है आस ।
माँ मुझे भी जीना है।
दुनिया नाम की हँसीन चीज देखनी है।
माँ तू तो मरे बिना है अकेली ।
वादा है मेरा सदा बनके रहूँगी तुम्हारी सहेली।

**– कु. वर्षा कांबले,**
बी.एस्सी. २

## कोई दिवाना कहता है

कोई दिवाना कहता है, कोई पागल कहता है।
मगर धरती की बैचेनी, को बस बादल समझता है।
मैं तुझसे दूर कैसा हुँ, तु मुझसे दुर कैसी है।
ये तेरा दिल समझता है, या मेरा दिल समझता है।

महोब्बत एक एहसासों की पावन कहानी है।
कभी कबीरा दिवाना था, कभी मिरा दिवानी है।
यहाँ सब लोग कहते है, मेरी आँखो में आँसु है।
जो तु समझे तो मोती है, जो ना समझे तो पानी है।

समंदर दिल के अंदर है, लेकिन रो नही सकता।
ए आँसु प्यार का मोती, इसको खो नही सकता।
मेरी चाहत को दुल्हन तु बना लेना मगर सुन ले जो
मेरी हो नहीं पाया, वो तेरा हो नही सकता।

भ्रमर कोई कुमुदिनी पर, मचल बैठा तो हंगामा।
हमारे दिल में कोई ख्बाब पल बैठा तो हंगामा।
अब तक डुबकर सुनते थे सब किस्से महोब्बत के!
मैं किस्से को हकिकत में बदल बैठा तो हंगामा।

**– रविंद्र बाळासो डाफळे**
बी. एस्सी. ३

## महाभारत

है कथा संग्राम की
विश्व के कल्याण की
धर्म, अधर्म, महादि अदंत
सत्य, असत्य क्लेश कलंक
स्वार्थ की कथा परमार्थ की
शक्ति है, भक्ति है,
जन्मों की मुक्ति है
जीवन का ये संपुर्ण सार है
युग-युग से कण-कण में
सृष्टी के दर्पण में
वेंदों की कथा अपार है
वीरों की गाथा है
देवों की भाषा है
सदियों के इतिहास कोटी प्रणाम है
कृष्णा की महिमा है
गीता की गरिमा है
ग्रंथो का ये ग्रंथ महान है
महाभारत, महाभारत.
महाभारत, महाभारत.

-कु. प्रियांका तानाजी मगदूम
बी. एस्सी. १

## कॉलेज

कॉलेज के ये मधुर क्षण
फिर ना वापस आयेंगे ।
सोच लो ये दोस्तो कल,
हम सब जुदा हो जायेंगे ।
भुल सकोगे क्या तुम,
कॉलेज की जो कहानी ।
याद करेंगे सब यह कहानी ,
आएगी जब याद पुरानी ।
आज तूम हो, आज हम है,
मंदिर है कॉलेज हमारा ।
कही रहेंगे तुम , कही रहेंगे हम,
फिर ना होगा मिलन हमारा ।
आज यहाँ जो पढते है,
कल उनका भी जाना होगा ।
हम ना रहेंगे, तुम ना रहोगे,
लेकिन, हमारी यादे हमेशा अमर रहेगी ।

- -कु. कविता पाटील
बी. ए. ३



-घोरपडे योगिता
बी. एस्सी. २



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर

यांना शतकोत्तरीय रौप्यमहोत्सवी जयंतीनिमित्त
विनम्र अभिवादन

# श्री दूधसाखर महाविद्यालय, बिद्री (मौनीनगर)



प्रजासत्ताक दिनी प्रशासकीय अध्यक्ष काकडेसो



सुव्यवहार वर्तन कौशल्य विकास कार्यशाळेत मार्गदर्शन करताना प्राचार्य अर्जुन कुंभा



जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त मार्गदर्शन करताना प्रा. पी. के. पाटील



शिवाजी विद्यापीठाच्या कर्मवीर भाऊराव पाटील व्याख्यानमाला मार्गदर्शन करताना प्राचार्य टी. एस. पाटील



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त मार्गदर्शन करताना माजी विद्यार्थीनी सौ. ललिता पाटील



साहित्याची निर्मिती या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. मोहन पाटील



डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या शतकोत्तरी रौप्यमहोत्सवी जयंती वर्ष निमित्त मार्गदर्शक श्री. राहूल कोसंबी



९ ऑगस्ट क्रांतीदिन मार्गदर्शन करताना मा. रावण एम. डी.

# श्री दूधसाखर महाविद्यालय, बिद्री (मौनीनगर)



स्पर्धा परिक्षेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना
पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र कुंभार



आय.ए.एस. परीक्षा उत्तीर्ण माजी विद्यार्थी कुलदीप कुंभार
स्पर्धा परिक्षा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना



५ सप्टेंबर शिक्षक दिन विद्यार्थी शिक्षकांना मार्गदर्शन करताना प्राचार्य



लोकराजा छत्रपती शाहू महाराज जयंती प्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. अनिल माने



म. गांधी व लालबहादूर जयंती प्रसंगी मार्गदर्शन करताना प्रा. अशोक जानवे



१४ सप्टेंबर हिंदी दिवस प्रसंगी मनोगत व्यक्त करताना विद्यार्थी



संक्रातीनिमित्त पारंपारिक वेषभूषेतील विवाह प्रसंग



शैक्षणिक सहल हिंदी विभाग

# श्री दूधसाखर महाविद्यालय, बिद्री (मौनीनगर)


वार्षिक क्रीडा स्पर्धेत बुद्धीबळ स्पर्धेतील अंतिम लढत


शास्त्र विभागाचा सदिच्छा समारंभ


शास्त्र विभागाचा शिक्षक दिन


'अविष्कार' २०१५-१६ मध्ये पोस्टर प्रदर्शन करणारे भौतिकशास्त्राचे विद्यार्थी


नितीन कुलकर्णी विनोदी शैलीतून मनोरंजन करताना


वार्षिक गुणगौरव समारंभासाठी उपस्थित विद्यार्थी


खादय महोत्सवचे उद्घाटन प्रसंगी मा. प्राचार्य


सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्घाटन करत असताना मा. प्राचार्य



*All successful people men and women are big dreamers. They imagine what their future could be, ideal in every respect, and then they work every day toward their distant vision, that goal or purpose.*

- Brian Tracy

# English Section

**Prof. Shrikrishna Salokhe**

# INDEX

## PROSE SECTION


| | | | |
|---|---|---|---|
| 1) | The Legacy and Philosophy of Karamaveer | - Miss. Chougule Pooja | B.A. II |
| 2) | Maximum Achievements | - Miss .Towar S. V. | B.A. III |
| 3) | Save the Baby Girl | - Miss. Aswale Madhuri D. | B.Sc. I |
| 4) | Chemical Analysis of Life | - Shri. Kumbhar Vinayak S | B.Sc. II |


## POETRY SECTION


| | | | |
|---|---|---|---|
| 1) | Life | - Miss. Komal Bhat | B.A. II |
| 2) | India | - Miss. Patil P. S. | B.A. I |
| 3) | Dad | - Shri. Ghodhade S. D. | B.Sc. II |
| 4) | A Home without mother | - Miss. Patil D. S. | B.Sc.II |
| 5) | Save our Earth | - Miss. Desai S. B. | B.A. III |
| 6) | Student's Life | - Miss. Bhat R. V. | B.A. I |
| 7) | Do It Now | - Miss. Ghare D. D. | B.A. III |
| 8) | Friendship | - Miss. Patil P. P. | B.Sc. II |
| 9) | What is life? | - Shri Alavekar V. V. | B.A. I |

# THE LEGACY AND PHILOSOPHY OF KARMAVEER

"Education through self-help is our Motto" - Karmaveer



A man of no university qualification but of strong common sense, of no money but of good physique and sound mind, undaunted courage and untiring energy, uninterrupted perseverance and efforts, a giant and all round worker a village himself, resolved to sacrifice his life and devote it to uplift of his brother villagers. Karmaveer Bhaurao Patil popularly known as "Anna" , bas born on 22 Sept, 1887 at Kumbhoj village in Hatkanangle tahasil of ex-princely state of Kolhapur. He picked up a smattring of elementary education at different places in Satara District. At the edge of sixteen, he was in first std. of highschool. In his studies, he used to lag behind, his promotion was halted give to his failure in the sixth standard in 1909. He was inspired by the works of Mahatma Gandhi. He became devotee of Gandhi and took up the work of village uplift including eradication of illiteracy, untouchability and promotion of inter caste & inter community unity. He wanted to undertake educational work, starting hostels for poor boys. Bhaurao himself founded his hostel in 1924 at satara by admitting Harijan boy Mohite in his own house in Satara city.

Bhauro was very self - respecting person. He did not like that his pupils should beg for learning education, he included "dignity of labour" earning first and then learning. Self respect and self reliance as the things on which his whole system of education or educational

ideology evolved. He said his pupils, "Do not stretch your palm for begging but for giving to those who are infirm and needy". He believed that education through contact with the lives of great men and things was far better an education than from books. Education through self-help and self reliance should be treated as his greatest contribution to the applied philosophy of education in India and elsewhere also. Bhaurao used to instruct the seniors and supervised their studies including their sports. The origin of the, "Earn and Learn" scheme are the manual labour scheme or the principles of self-help and self reliance preached by Bhaurao. All these schemes were meant for the temporal uplift of an individual and not for his spiritual uplift as of the olden days. The principle of simple life and high thinking was practised by Bhaurao himself. One of the students of Bhaurao said, 'The life of Karmaveer Anna has taught us many things, he created in us such confidence we could mould any situation to our advantage, he was a great sculptor of many young men like me he was real servant of the people he carved many living status out of unhewn stones in Maharashtra and created a tradition of servants of people in his own image.' The educational philosophy of Bhaurao indeed is social philosophy which is applied in its nature. His philosophy definitely influenced education policy of Maharashtra Government and the Government of India also.

"Jay Karmaveer"

Reference : Dr. Kadiyal R.A.- Karmaveer Bhaurao Patil his contribution to education in Maharashtra, Indumati Publication Kolhapur.

- Compiled By **Miss. Chougule Pooja** (B. A. II)



– पाटील अक्षय
बी.एस्सी. २

# MAXIMUM ACHIEVEMENTS

**Four Keys to success :**

